FORWARDED BY MOSES DANIEL T.
BOMBAY

# बागो बहार.

अथवा.

## चार दरवेशांच्या गोष्टी.

### भाग २.

इंग्रेजी मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

**मोशे दानिएल तळकर**

याणें केलें.

या ग्रंथावर सन १८४७ चा आक्ट २० प्रमाणें ग्रंथ स्वामित्वाची मालकी आहे.

मुंबई मध्यें.

"न्याशनल" छापखान्यांत

कमळोजी गवरोजी यांणीं छापिलें.

ईसवी सन १८७१

ईस्राएली ५६३१

किम्मत १ रुपाया.

TO,

# Dr. BHÁU DÁJÍ G. G. M. C.

HIGH SHERIFF OF BOMBAY, FELLOW OF THE UNIVERSITY OF BOMBAY, HONORARY MEMBER OF THE ROYAL ASIATIC SOCIETY, VICE-PRESIDENT OF THE BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC SOCIETY, OF THE BOMBAY GEOGRAPHICAL SOCIETY, MEMBER OF THE LINNŒAN SOCIETY &c. &c. &c.

THIS SMALL WORK IS DEDICATED

AS A TOKEN OF RESPECT, AFFECTION, AND GRATITUDE

BY

THE AUTHOR.

# प्रस्तावना.

आलिकडे व्यापार, विद्या आणि सुधारणूक ह्यांची वृद्धि पूर्वींपेक्षां विशेष होत चालली आहे; आणि ह्या वृद्धिच्या मानाप्रमाणें देशाची भरभराटो वाढून तत्संबंधी दुसऱ्या ज्या गोष्टी ह्मणजे, विद्योत्पन्न कीर्तिविषयीं अभीरुची, आपले विचार निस्पृहपणें प्रगट करणें, छापखानें वर्तमानपत्रें, पुस्तकालयें,, आणि विद्वान लोकांच्या मंडळ्या इत्यादिकांस मोठें उत्तेजन आलें आहे. मराठी विद्येची वृद्धि ही वरील गोष्टीपैकींच होय.

अशा सुधारणेच्या कृत्यांत आमचें इंग्रेज सरकार उदार आश्रय देण्यास मागें पुढें पहात नसल्या कारणानें निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ करण्यास उत्तेजन येऊन विद्येची बढती होऊन सुधारणुकेचें पाऊल दिवसानुदिवस पुढें जात चाललें आहे; येणेंकरून सर्वांस आनंद झाल्यावांचून राहणारच नाहीं.

सदरहू पुस्तकाच्या पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें हें इंग्रेजी मूळ ग्रंथाचें हुबेहुब भाषांतर नव्हे. कारण इंग्रेजी प्रमाणेंच मराठींत तर्जुमा केल्यास जशी गोडी यावी तशी येत नाहीं ह्मणून त्यांतून कांहीं भाग गाळला आहे व कित्येक ठिकाणीं मूळ ग्रंथांत नसतां अधिक जोडला आहे.

सर्वत्र विद्वज्जनांस माझी विनतीपूर्वक अशी प्रार्थना आहे कीं यांतील दोषांकडे लक्ष न पुरवितां त्याची क्षमा करून आपला उदार आश्रय द्यावा.

मुंबई तारीख १ ज्यानेवारी १८७१. } मोशे दानिएल तळकर.

---

क्रा. 30

# बागोबहार अथवा चार दरवेश.

## भाग दुसरा.

### दुसऱ्या दरवेशाची गोष्ट.

जेव्हां दुसऱ्या दरवेशावर आपली कथा सांगण्याची पाळी आली, तेव्हां त्याणें मोठ्या अदबीनें बसून गोष्ट सांगण्यास प्रारंभ केला.—

"मित्रहो, मी आपली प्रारंभापासून शेवटपर्यंत कथा तुह्मास निवेदन करितों, इजकडे लक्ष द्या. ह्या दुर्दैवी फकीराच्या दुःसाध्य रोगास औषध देऊन बरा करील, असा वैद्य तर संपूर्ण जगांत ही सापडणें कठीण ; कारण या हतभाग्याचें दुःखच मनुष्याच्या शक्तीपलीकडचें आहे ; तथापि तुह्मा सर्व मित्रांच्या संतोषार्थ मी निष्कपटभावानें सांगतों."

"माझे भगवद्भक्त मित्रहो, हा आपल्या मंडळींत बसलेला हतभाग्य देह पर्शियाचा राजपुत्र होय. ज्या देशांत महान् विद्वान् जन्मले, ज्याची कलाकौशल्य व अनेक विद्या प्राविण्याविषयीं सर्वत्र ख्याती आहे, ज्याची बरोबरी करणारें राष्ट्र त्रिभुवनांत ही सांपडणार नाहीं, ज्याची श्रेष्ठता पृथ्वीच्या अर्ध भागाहून ही अधिक, ज्यां-तील हवा समशितोष्ण, प्रजा संपन्न, विद्वान, निरोगी

व आनंदांत निमग्न, अशा उत्तम व संपन्न राष्ट्राचें आधिपत्य माझ्या तीर्थरूपाकडे होतें. माझा पिता मोठा विचारी, दूरदर्शी, सहिष्णु आणि विद्याभिज्ञ असे, त्याणें मला अनेक विद्या व कला कौशल्यें यांचें शिक्षण देण्याकरितां प्रत्येक विषयाकरितां वेगळाले विद्वान् शिक्षक ठेविले होते, व मीही पित्याच्या व शिक्षकांच्या आज्ञेप्रमाणें अभ्यास करीत असें ; या योगानें व परमेश्वराच्या कृपेनें मी वयाच्या चवदाव्या वर्षी कला कौशल्यें, न्याय, ज्योतिष, राजनीति, शारीर वगैरे विद्यांत बराच निपुण झालों. विद्येचा प्रभाव माझ्या हृदयांत बिंबल्यावर अनेक विद्वानांचीं प्रथक् प्रथक् विषयांवरचीं व्याख्यानें ऐकावीं, देशोदेशीचे, तेथील राजांचे व थोरांपासून हलक्या स्थितीपर्यंतच्या लोकांचे इतिहास ऐकण्याची मला फार आवड लागली, व त्यासंबंधानें मोठमोठ्या संभावित, कुलीन व विद्वान् गृहस्थांशीं माझी मैत्री झाली.

माझा एक मित्र मोठा विद्वान, अनेक देशांतील लोकांच्या रीतिभातींचा अनुभवी, इतिहासांत मोठा माहितगार, धूर्त व सदाचारी होता; तो मला ह्मणाला. "मित्रा, पहा हा नरदेह जरीं क्षणभंगूर आहे तरी त्याच्या हातून अशीं कांहीं अघटित कृत्यें घडून येतात कीं; त्यांची दिगंतरीं कीर्ति होये इतकेंच नव्हे, परलोकीं ही तीं वर्णनीय व कर्त्याच्या सुखाचा मुख्य कारण होतात. अशीं लोकोत्तरकृत्यें करून नीतिमान् व कीर्तिमान् उपपद पावलेल्या सत्पुरुषापैकीं एका

ची संक्षिप्त इतिहास तुला सांगतों. साधारणतः तुला नीतिमत्वाची आवड आहे; तर त्या सत्पुरूषाच्या वागणुकेचा विचार करून जर या पुढें वर्तन करशील, तर तुझें चांगलें कल्याण होईल." मला अशा कथा ऐकण्याचा चटका होताच; त्यामुळें तत्काळ ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली व त्याणें **हतीम ताईचा** वृतांत सांगण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला—" मित्रा, हतिमाच्या वेळीं आर्बस्थानांत **नौफील** नावाचा राजा राज्य करीत असे. हतिमाच्या नामांकित व दयालुपणाच्या कीर्तीमुळें तो त्याचा फार द्वेष करीत असे. एका वेळीं परचक्राशीं लढाई करण्याकरितां सर्व फौज व सरदार मंडळी एकत्र झाली; परंतु हतीम मोठा पापभीरू व सभ्य असल्यामुळें लढाईंत अगणित ईश्वराचे लाल विनापराध मृत्यु पावतील व त्या पापाचा अंशतः तरी भागीदार आपण होईन अशा दयार्द्र बुध्दीनें तो फौजेंतून पळून जाऊन एका डोंगरांत छपून राहिला.

हतीम पळून गेला ही वार्ता **नौफील** राजानें ऐकिल्याबरोबर त्यास मोठा संताप येऊन त्याणें हातिमाची मालमिळकत जप्त करून शहरांत दवंडी पिटविली कीं; जो मनुष्य हतिमास धरून आणील, त्यास सरकारांतून ५०० मोहोरा इनाम मिळतील. ही जाहिरात ऐकून कित्येक धनलोभी लोक मोहोरांच्या आशेनें बारकाईनें हतिमाचा तपास करूं लागले. एकेदिवसीं कोणी वृध्द पुरूष, आपली वृध्द स्त्री आणि दोन तीन लहान मुलांसह ज्या गुहेंत हतीम छपून राहिला होता, तिच्याजवळ

लांकडें तोडण्याकरितां गेला. भर दोनप्रहरचें ऊन आणि लांकडें तोडण्याचे श्रम, यामुळें तें दरिद्री कुटुंब अतिशय श्रांत होऊन विश्रांती करितां एका वृक्षाखालीं बसलें असतां म्हातारी म्हणते. "प्राणनाथ, कितीबरें आपण दुर्दैवी आहों. ईश्वराचाच आपल्यावर खरोखर राग आहे. हतीम जर अपल्यास सांपडता, तर राजानें कबूल केलेल्या पांचशें मोहरांवर आपला प्रपंच निदान एकवर्ष तरीं उत्तम चालला असता. पण उपयोग काय? परमेश्वराची कृपा होईल तेव्हां खरें." हें पत्नीचें भाषण ऐकून त्या वृद्ध मनुष्यास फार राग आला व वाईटही वाटलें. तो म्हणाला.– "प्रिये अशा कल्पना करून विनाकारण जीवास हृद्रोग लावून घ्यावा यांत अर्थ तो कोणता? अगे, आपल्या प्रारब्धीं हेंच आहे कीं; दररोज जंगलांतून लांकडें गोळा करून गांवांत नेऊन विकावीं व मिळतील तेवढ्या पैशांत मिळेल ती ओली कोरडी खाऊन दिवस काढावे, किंवा आयुष्याची दोरी तुटून एकाद्या दिवशीं जंगलांत फिरतां फिरतां वाघ, लांडगा, सिंह वगैरे कोणी हिंसक जनावरानें धरिलें तर मरावें, ही आपल्या प्रारब्धाची सलामत असतां उगीच मनांत मांडे खाण्यांत काय बरें अर्थ आहे? तशांत हतिमासारख्या सत्पुरुषाला दुःखांत घालून मिळविलेला पैसा जयास येणार आहे काय? याकरितां या सर्व कल्पना सोडून असत्या स्थितींत आनंद मानावा हेंच योग्य आहे." हें आपल्या पतीचें बोधपर भाषण ऐकून ती वृद्धबाई एक दुःखा

अहि ९०/९

चा सुस्कारा टाकून स्तब्ध राहिली.

हा सर्व संवाद हातिमानें गुहेंतून ऐकिला व विचार केला कीं; "मी माझ्या एकटयाच्या बचावाकारितां छपून राहून या अनाथ व निराश्रित कुटुंबास होणारा फायदा बुडवावा हें माझ्या मनुष्यत्वास व औदार्यास अगदीं लांछनप्रद आहे. ज्या मनुष्यास दया नाहीं तो मनुष्यच नव्हे, त्यास शुद्ध द्विपद पशु ह्मणण्यास ही प्रत्यवाय नाहीं. परमेश्वरानें इतर जीवांपेक्षां मनुष्यासच अधिक ज्ञान दिल्हें, याचा उपयोग केवळ प्रसंगीं दुसऱ्यावर दया करणें हाच होय. एरव्हीं परमेश्वराची प्रार्थना करण्यास देव दूत व आहार निद्रा मैथुनादि भोग भोगण्यास इतर योनी नव्हत्या कीं काय ?" याप्रमाणे हातिमाचें अंतःकरण त्या वृद्ध दंपतीच्या दयेनें कळवळत असतां त्याणें शेवटीं त्यावर आपला पूर्ण अंमल बसविला. हतीम एकाएकीं त्या वृद्ध मनुष्याच्या पुढें येऊन उभा राहिला व ह्मणाला; "मित्रा, ज्यास पकडण्याबद्दल राजानें पांचशें मोहरा इनाम लाविलें आहे, तोच मी हतीम. आतां मला राजाकडे घेऊन चल, ह्मणजे राजा कबूल केल्याप्रमाणें मोहरा देईल व त्यांवर तुझा उत्तम चरितार्थ चालेल." हें हातिमाचें लोकोत्तर औदार्य पाहून त्या वृद्ध मनुष्याचा कंठ सद्गदित झाला. तो मोठ्या अदबीनें हातिमास सलाम करून ह्मणाला; "महाराज, आपण ह्मणतां या सर्व गोष्टी खऱ्या; परंतु मी असें केल्यापासून राजा आपणास कितीबरें दुःख देईल ? आपल्या सारख्या उदार पुरुषाच्या प्राणावर

उदार होऊन मिळविलेलें द्रव्य, मला किती दिवस बरें पुरणार आहे ? यदाकदाचित् पुरलें, तरीं ईश्वरापाशीं याबद्दल मी काय बरें जबाब द्यावा? आपण सुखरूप असून मला यांहीपेक्षां दुःख सोसावें लागलें, तरीं चिंता नाहीं; परंतु असें पापद्रव्य संपादन करण्यास मी कधींही प्रवृत होणार नाहीं.

हतीम त्याची पुष्कळ प्रकारें आर्जवें करून ह्मणाला; "मित्रा, मला घेऊन चल, खरोखर मी आपल्या खुषीनें सांगतों. ही सर्व मालमत्ता व हा माझा देह कोणाही प्राण्याच्या संकटसमयीं उपयोगीं पडावा एवढीच माझी सदोदित इच्छा आहे." हातिमानें आपल्याकडून पुष्कळ प्रकारें त्या वृद्ध व पापभीरु पुरुषाची समजुत केली, तरीं तो हतिमास नेण्याविषयीं कबूल होईना. शेवटीं निरुपाय होऊन हतीम त्यास म्हणतो. "मित्रा, जर माझ्या इच्छेप्रमाणें तूं मला राजाकडे न नेलें, तर मी स्वतः राजास जाऊन सांगेन कीं; अमुक वृद्ध मनुष्यानें मला आजपर्यंत लपवून ठेविलें होतें." हतिमाचें हें अगदीं निकराचें बोलणें ऐकून तो वृद्ध मोठ्यानें हसला आणि ह्मणाला "महाराज, जर चांगल्या कृत्याबद्दलही वाईट फळ मिळूं लागलें, तर त्याचा दोष आपल्या पूर्वसंचितावांचून कोणावर ठेवावा ?" या उभयतांचा चाललेला संवाद आसपास असलेले दुसऱ्या लोकांनीं ऐकिल्यामुळें अगदीं थोडक्या वेळांत हतिमाच्या सभोंवता लोकांचा गराडा पडला. "ज्या हतिमास पकडण्याकारितां सरकारांतून पांचशें मोहरांचें इनाम

लागलें आहे, तोच हा हतिम." अशी त्यांची खात्री झाल्यावर ते सर्व लोक बक्षिसाच्या आशेनें आपला सर्व काम धंदा सोडून हतिमास घेऊन शहराकडे परतले व तो वृद्ध मनुष्य ही हतिमाच्या भावी परिणामाच्या विंवचनेंत दुःख करीत त्यामागें शहरांत गेला. हतिमास राजापुढें नेल्यावर राजास मोठा आनंद होऊन त्याणें सर्वांस विचारिलें कीं ; "हतिमास कोणी पकडलें ?" राजाच्या मुखांतील हीं अक्षरें ऐकतांच त्या सर्व समुदायांस जरीं बक्षिसाची आशा होती; तरीं त्यांच्यानें मी पकडला असें एकदम सांगवेना. त्यांत एक मोठा आपस्वार्थी, पाषाणहृदयी व पापास न भिणारा मनुष्य होता, तो ह्मणाला; 'महाराज, मजसारख्या पराक्रमी व धूर्त पुरुषावांचून असें दुर्घट काम दुसरा कोण बरें करणार आहे? महाराज फार काय सांगूं? अशा नाजूक व चातुर्याच्या कृत्याबद्दल स्वर्गलोकींही माझी कीर्ति आहे.' असें त्याचें भाषण चाललें आहे तों त्याचा निषेध करून दुसरा एक त्याच मासल्याचा प्रतापी पुरुष पुढें होऊन बोलूं लागला; 'हें सर्व खोटें आहे, अशी आपली देखील खात्री झालीच असेल, खरोखर ह्मटलें तर हतिमास एकटया या दासानेंच पकडलें आहे. महाराजांची आज्ञा झाल्या दिवसांपासून रानावनांतून व उन्हातान्हांतून अभीदकाची ही पर्वा न करितां धावपळ करीत फिरून भयंकर अरण्यांतून हतिमास पकडून आणलें आहे. महाराजांस ठाऊक असेलच कीं; मत्सरी व आपस्वार्थी लोक, दुसऱ्याचा तोटा करण्या-

करितां समयीं आपणास ही दु:ख संपादित असतो, त्याप्रमाणें माझ्या विरुद्ध सांगण्यास ही कोणी ठक पुढें होईल, पण आपण खरोखर न्यायकर्ते आहां तेव्हां तशा थापेवर आपण अन्याय करणार नाहीं अशी माझी पूर्ण खात्री आहे. तर आतां विलंब न करितां कबूल केलेल्या मोहोरा व आणखी काय महाराजांची प्रसन्नता असेल त्याप्रमाणें इनाम मला मिळावें हें अगदीं योग्य आहे. याप्रमाणें मोहरांच्या आशेनें जो तो 'हतिमास मी पकडलें' ह्मणून प्रतिपादन करूं लागला. तो वृद्ध मनुष्य एका कोपऱ्यांत बसून सर्वांच्या बढाया ऐकत व हतिमाच्या भावी परिणामाबद्दल दु:ख करीत बसला होता. जेव्हां सर्वांच्या आत्मस्तुतीच्या बल्गना संपल्या, तेव्हां हतीमानें राजापुढें हात जोडून सांगण्यास प्रारंभ केला. तो ह्मणाला; "महाराज, खरोखर जर ह्मणाल तर आपल्या दरबारच्या कोपऱ्यांत जो वृद्ध सात्विक मनुष्य बसला आहे, त्याणें मला धरिलें. तो मला नगरांत आणीत असतां हे सर्व लोभी व आत्मप्रौढी दाखविणारे लोक वाटेंत मिळाले आहेत; हें यांच्या चर्येवरून आपणास सहज समजण्यासारखें आहे. राजाधिराज, मी पामरानें आपणास सांगावें असें नाहीं; तथापि विनंती करितो कीं, मला धरण्याबद्दल आपण जें इनाम कबूल केलें असेल, त्याजवर फक्त त्या वृद्ध पुरुषाचाच हक्क आहे; यासाठीं तें आतां अनमान न करितां त्या वृद्धास इनाम द्यावें. मनुष्यांस ईश्वरानें जी वाणी दिल्ही आहे, तिचा उपयोग एवढाच कीं;

विचार करून बोलावें व बोलल्याप्रमाणें वागावें. असें जर मनुष्याच्या हातून न घडेल, तर त्याच्यांत आणि पशूंत भेद तो कोणता ? जिव्हा सर्व प्राणिमात्रास आहे."

हें ऐकून नौफील राजानें त्या वृद्ध लांकुडवाल्यास आपल्याजवळ बोलावून प्रश्न केला. 'बाबा, हतिमास कोणी पकडलें याचा निर्णय आतां तुजवर ठेविला आहे, तर ईश्वरास स्मरून जें खरें असेल तें सांग.' राजाच्या तोंडचीं हीं अक्षरें निघतांच त्या वृद्ध लाकुडवाल्यास दुःखाचें भरतें येऊन त्याच्यानें कांहीं बोलवेनासें झालें, व कांहीं अवकाशानें राजास घडलेला वृत्तांत इत्थंभूत सांगितला.

लाकूडवाल्याचें सप्रेम भाषण ऐकून राजास ही मोठें आश्चर्य वाटलें. राजानें हतिमास मोठ्या आनंदानें मुक्त करून आपल्याजवळ बोलाविलें. राजा ह्मणाला; 'हतिमा, तुझी तारीफ किती करावी ? अरे अनाथाच्या सौख्या-करितां प्रत्यक्ष आपला प्राण ही धोक्यांत घालावयास ही चुकला नाहींस; यापेक्षां तुझ्या औदार्याची सीमा ती कोणती ?' याप्रमाणें प्रथम हतिमाचा सन्मान करून नंतर हुकूम केला कीं; हतिमास पकडल्याची ज्यांणीं ज्यांणीं बढाई झोकली आहे त्या सर्वांच्या मस्तकावर मोहोरांबद्दल पांचपांचशें जोडे मारावे. राजाचा हा हुकूम होतांच सेवकांनीं तत्क्षणीं त्या बढाईखोरांच्या मुसक्या बांधून बक्षीस दिलें, ही व्यवस्था झाल्यावर त्या वृद्ध मनुष्याची पापभीरुत्वाविषयीं तारीफ करून राजानें आपल्या हातानें त्यास पांचशें मोहोरा दिल्या.

हा सर्व प्रकार झाल्यानंतर **नावफॉल** राजास पराकाष्ठेचा पश्चात्ताप झाला. तो वारंवार आपणास दोष देई आणि ह्मणे, " मुर्खा, नावफाला, हतिमासारख्या सत्पुरुषांशीं द्वेष करण्यांत उपहास, दुष्टता, अविचारीपणा, अपरीक्षकपणा व सत्याचा नाश यांवाचून कोणता बरें फायदा झाला ? अरे ज्या मनुष्यानें अनाथाच्या कल्याणाकरितां निःशंकपणानें स्वतः आपणास प्राणोत्क्रमणाच्या धोक्यांत घालण्यास ही आळस केला नाहीं त्या पुण्यश्लोकाबरोबर द्वेष करण्यानें कोणता बरें प्राणी सुखी होणार आहे? " असा पश्चातापानें खिन्न झालेला नावफल राजा हतिमाचा गौरव कसा करावा या विचारांत निमग्न झाला. त्याणें मोठ्या प्रेमानें आणि सत्कारानें हतिमाचा हात धरून त्यास ह्मणाला; " हतिमा, तुला मित्र ह्मणून हाक मारण्यास मला परवानगी दे. मजसारख्या कृतघ्नाबरोबर मैत्री करण्यास तुझें धैर्य होणार नाहीं हें मी पक्कें समजतों, तरी माझ्या विनंतीकडे लक्ष देऊन एवढी देणगी मला दे. अशी परोपकाराचीं कृत्यें तुजसारख्यानेंच करावीं व हीं तुलाच शोभतात." असें ह्मणून त्यास आपल्या शेजारीं बसविलें, त्याची जी मालमत्ता जप्त केली होती ती त्याच्या स्वाधीन केली आणि त्यास त्याच्या जातींत मुख्य केलें, त्या वृद्ध लाकुडवाल्यास कबूल केलेल्या पाचशें मोहरा दिल्यावर त्या घेऊन तो वृद्ध मोठ्या आनंदानें हतिमास व राजास आशीर्वाद देऊन ईश्वराचीं स्तुति करून आपल्या घरीं गेला.

३६ - ११०८.



यामप्रमाणें माझ्या मित्राच्या मुखांतून हतिमाची गोष्ट ऐकून मला मोठी लज्जा वाटली. मी विचार केला कीं; हतिम एकाच जातीचा मुख्य होता व त्याच्या एकाच उदार कृत्याबद्दल ही जगद्व्यपी व चिरस्थाई कीर्ति झाली आहे, परंतु मला तर कृपाळू परमेश्वरानें या अफाट व संपन्न इराण देशाचें राज्य दिलें आहे, अशा स्थितींत लोकोपकारक कृत्यें न करावीं ही मजसारख्या संपन्न मनुष्यास मोठ्या लज्येची गोष्ट आहे; कारण याजमध्यें औदार्यासारखी दुसरी कोणतीच उत्तम गोष्ट नाहीं. मनुष्यास इहलोकीं केलेल्या कृत्याचें फळ परलोकीं मिळतें. जसें भुमींत एक दाणा पेरला ह्मणजे त्यापासून कितीवरें धान्य येतें ? तसेंच सत्कृत्यापासून मनुष्यास फळ मिळेल. असा विचार करून लागलाच कारखान्यांतील मुख्यांस हुकूम केला कीं; " शहराच्या बाहेर फार जलदीनें एक विस्तीर्ण व सुशोभित मंदिर तयार करावें व त्याच्या सभोंवतीं उंच व विस्तीर्ण असे चाळिस दरवाजे करावे. थोड्याच दिवसांत माझ्या इच्छेप्रमाणें ती इमारत तयार झाली. पुढें मी प्रत्यहीं असा नियम ठेविला कीं; त्या रमण्यांत जाऊन चाळीसही दरवाजांतून मागणाऱ्या अनाथांस सोनें व रुपें प्रात:काळपासून सायंकाळपर्यंत वाटावें. हा माझा नियम परमेश्वरानें बरेच दिवस चालविला. एके दिवसीं असें झालें कीं; एका फकीरानें एका दरवाजांत मजपासून एक मोहोर घेतली, मी दुसऱ्या दरवाजांत गेल्यावर तेथेंही याणें येऊन भिक्षा मागितली, याला

पूर्वी एक मोहोर दिली आहे, हें जरीं माझ्या लक्षांत होतें, तरीं कांहीं एक न बोलतां त्यास दोन मोहरा दिल्या. पुढें तिसऱ्या दरवाजांत मी जातों, तों फकीरही तयार होताच. तेव्हां आतां हा किती दरवाजे फिरून मोहोरा घेतो हें पहाण्यासाठीं मी त्यास तीन मोहरा दिल्या. या क्रमाप्रमाणें होतां होतां शेवटीं तो चाळिसाव्या दरवाजांत येऊन वाटल्या मोहरा घेऊन पुनः माझ्या मागें पहिल्या दरवाजांत पूर्वीप्रमाणेंच दीन स्वरानें एक मोहोर मागूं लागला. मला त्याच्या लोभीपणाचा विलक्षण संताप येऊन त्यास ह्मणालों 'हे लोभी मनुष्या, तूं कोणत्या प्रकारचा फकीर आहेस हें मला समजत नाहीं; तूं फकीर या शब्दाचा अर्थ तरीं समजतोस? ज्याणें आपल्यास फकीर ह्मणवावें, त्याणें त्या शब्दाचा मूळ अर्थ व उद्देश पाहूनच वागलें पाहिजे? तेव्हां तो फकीर मोठ्या नम्रतेनें ह्मणाला 'महाराज फकीर, या शब्दाचा मूळ अर्थ काय हें कृपाकरून सांगाल, तर फार उपकार होतील.' मी ह्मणालों, "ऐक तर नीट लक्षपूर्वक; फे ह्मणजे फाके (उपास,) काफ ह्मणजे कीनाएत (संतोष) आणि रे ह्मणजे रियाझत (ईश्वर भक्ति.) इतकें करणारा त्यासच फकीर ह्मणावें; याप्रमाणें जो चालत नाहीं, तो फकीरच नव्हे. तुला जें कांहीं मजकडून मिळालें आहे व पुढें मिळेल, तें केवळ हल्लींची गरज भागण्याकरितांच होय. साठवून ठेवण्याकरितां देण्याचा माझा मुळींच उद्देश नाहीं. तर आतां मिळालेल्यांत संतोष मानून रहावें हें संप-

त्यानंतर पुनः ये. हावऱ्यासारखा संग्रह करून तुला काय बरें करावयाचें आहे? कारण खरा फकीर, केवळ चालत्याच काळाची व्यवस्था पहात असतो, पुढच्याविषयीं त्यास तिळमात्र काळजी नसते. बाबारे, सर्व जगाचें पालन करणारा परमेश्वर समर्थ असतां फकीर ह्मणविणारा तूं अलौकिक लोभी बनला आहेस, तेव्हां अशी ही चमत्कारिक फकीरी तरीं तुला कोणी दिली? तुझें मन जरीं निर्लज्ज असलें तरीं त्या पवित्र ( फकीर ) नामाच्या लज्जेसाठीं तरीं लोभ आवर. आणि जें मिळालें आहे, त्यांत तृप्त हो."

हें मोठें कठोर व हृदयभेदक भाषण ऐकून त्यास फार राग आला व मजजवळून ज्या कांहीं मोहोरा त्यास मिळाल्या होत्या, त्या त्याणें मैदानांत उडवून दिल्या व ह्मणाला; "महाराज, आतां क्षमाकरून शांत व्हा. हें आपलें सर्व द्रव्य परत घ्या, आपला सदुपदेश मला शिरसा मान्य आहे; परंतु या पुढें आपण मात्र आपल्यास **सखी** ( दाता ) हें विशेषण लावूं नका. दाता हें विशेषण बाळगणें मोठें कठीण काम आहे. या विशेषणाचा भार सहन करण्यास आपण फार अशक्त आहां. अद्यापि आपण त्या विशेषणापासून फार दूर आहां. महाराज, **फकीर** हा शब्द जसा चार वर्णांनीं जोडला आहे, त्याचप्रमाणें **सखी** शब्दही आहे; तर प्रथम त्यांच्या मूळ अर्थाप्रमाणें वर्तणूक करा आणि मग सुखेनैव त्या पवित्राक्षरांचा गर्व करा." हें त्या फकीराच्या मुखांतलें भाषण ऐकून मी फार खिन्न झालों.

मी त्या फकीरास ह्मणालों ; हे पवित्र साधो, कृपाक रून त्या तीन अक्षरांचा अर्थ मला सांगा. फकीरानें थोडेसें हास्य करून बोलण्यास प्रारंभ केला. तो ह्म णाला;"महाराज, स्वस्थ मानसें करून ऐका. **सोन** ह्मणजे **समाई**(सहनशीलता) **खे** ह्मणजे **खौफइलाही** (ईश्वराची भीति,) आणि **ये** ह्मणजे **याद** (आपण आलों कोठून व जाणार कोठें याचें निरंतर स्मरण) जेथपर्यंत तुह्मी याप्रमाणें वागत नाहीं, तेथपर्यंत ती उपमा तुह्माला शोभत नाहीं. जो खरा दाता आहे, त्याच्या हातून जरी एकादी गोष्ट चुकली तरी तो औदार्याच्या जो रानें ईश्वरास प्रियच असतो. महाराज, या फकीर पुष्कळ शहरांचा प्रवास केला; परंतु **बसोरा** शहरच्या राजकुमारी सारखी खरी दातृता कोठें ही पाहिली नाहीं. **दाता** या शब्दास खरोखर तीच अधिकारी आ हे; दुसरे जे कोणी दाते ह्मणवितात, ते केवळ नांवा चे मात्र; परंतु दातृत्वाच्या खऱ्या गुणाचा त्यांच्या अंगी लवलेश ही नसतो." हें त्याचें भाषण ऐकून मी त्याच्या जवळ क्षमा मागितली व जें पाहिजे असेल तें घेण्याविषयीं परोपरीनें विनवणी केली; परंतु माझ्या भाषणाकडे लक्ष ही न देतां तो चालता झाला व जातेवेळीं हे पुढील शब्द बोलला.—"आतां तुह्मी आ पलें सर्व राज्य जरीं मला दिलें तरीं तें मला वमनप्राय आहे." असें बोलून तो फकीर चालता झाला व मी त्या राजकन्येच्या प्रशंसा श्रवणानें अत्यंत उद्विग्न हों त्साता शेवटीं कांहीं तरी निमित्तानें त्या राजकन्येस

राहिल्यावांचून गत्यंतर नाहीं, असा अंतःकरणाचा दृढ निश्चय केला.

मित्रहो, " मनसा चिंतितं कार्यं, दैवमन्यत्र चिंतयेत् " याप्रमाणें माझ्या या प्रवासाच्या निश्चयाच्या संधीसच **पादशाहा** (माझाबाप) मृत्यु पावला, व त्याच्या गादीवर माझी स्थापना झाली. खरोखर ह्मटलें तर मी राज्यपदारूढ झाल्यावर माझे हे वृथा संकल्प सर्व नाहींसे व्हावे; कारण सर्व राज्याचें जोखीम माझ्याच शिरावर होतें; तथापि **बसरा** शहरास जाण्याची इच्छा माझ्या मनांतून गेली नाहीं. एके दिवशीं मी माझ्या वजीरास व राज्यरूप इमारतीच्या खांबासारखे दुसरे जे राज्य कारभारी मुसद्दी होते, त्यांसर्वांस पाचारण केलें. व त्यांस सांगितलें कीं, **बसरा** शहरापर्यंत प्रवास करावा अशी माझी इच्छा आहे, तर तुह्मी सर्वांनीं मोठ्या हुषारीनें आपापलीं कामें करावीं, ईश्वर कृपेनें मी लवकरच परत येईन. या माझ्या मतास कोणीही अनुमोदन दिलें नाहीं. यामुळें तेव्हांपासून माझें अंतःकरण फारच उद्विग्न होऊं लागलें, व दिवसानुदिवस त्या उदार राजकन्येस पाहाण्याची इच्छा ही अधिक वाटूं लागली. एके दिवशीं कोणास न कळवितां मी माझ्या प्रधानास बोलावून त्यास प्रतिनिधीचा अधिकार देऊन राज्याची चांगल्या रीतीनें व्यवस्था करण्यास सांगितलें. आणि मी फकीराचा पोषाख करून एकटाच बसरा शहरचा मार्ग धरला.

कांहीं दिवसांनीं मी जेव्हां तिच्या राज्याच्या हद्दींत

येऊन पोहोंचलों, तेव्हांपासून हे चमत्कार माझ्या दृष्टीस पडूं लागले; मला जेथें रात्र होई तेथें मी मुक्काम करीत असें मी तेथें पोहोंचल्या बराबर त्या राजकन्यकेचे नोकर येऊन मला एका मोठ्या सुंदर रमणीय मंदिरांत नेत माझ्या इच्छेप्रमाणें मला सर्व पदार्थ पुरवीत व माझ्या आज्ञेमध्यें माझ्या विश्वासु व एकनिष्ठ चाकरां प्रमाणें तत्पर असत. याप्रमाणें मी जसजसा पुढें जात गेलों, तसतसा माझा आदरसत्कार अधिकच होत गेला. याप्रमाणें व्यवस्था पाहून आश्चर्य आनंद आणि ईश्वराचें औदार्याविषयीं निःशंक झालेला मी कांहीं दिवसांनीं बसरा शहरास पोंचलों. इतक्यांत एक सुंदर व तरूण पुरूष, अंगावर [illegible]ूल्य वस्त्र अलंकार आभरण करणारा व मुखचर्येवरून मोठा सभ्य दिसणारा असा मजजवळ येऊन ह्मणाला; "महाराज, मी फकीरांचा तबिदार आहें, माझें काम इतकेंच कीं; जे कोणी फकीर, प्रवासी अथवा कोणीही पुरूष एथें येतात. त्यांची मी मार्गप्रतीक्षा करीत बसावें व आल्याबराबर मोठ्या सत्कारानें आपल्या घरं नेऊन त्यांचा खाण्यापिण्याचा वगैरे यच्चयावत बंदोबस्त ठेवावा. माझ्या गृहावांचून त्यांस या शहरांत दुसरें ठिकाण नाहीं. महाराज, आतां विलंब न लावितां या अनाथाच्या आश्रमांत पायधूळ झाडावी ह्मणजे मला कीर्ति व आनंद यांचा लाभ होईल."

हें त्याचें भाषण ऐकून मीं त्यास विचारिलें. 'महाराज आपलें नांव काय, तें कृपाकरून सांगावें ? तो

ह्मणाला " महाराज, या पामर दासाच्या देहास बेदा-
रबख्त अशी संज्ञा आहे. " त्याची लीन वर्तणूक, पो-
क्त व प्रियभाषण आणि गंभीर मुद्रा पाहून मी मोठ्या
संतोषानें त्याजबराबर गेलों, त्याच्या घरचा थाट पाहा-
तों तों एक मोठें राजमंदिराप्रमाणें सुंदर मंदिर
आहे, व त्यांत अतिथि सत्काराची सर्व सामग्री सिद्ध
आहे. आह्मी उभयतां मंदिरांत गेल्यावर त्याणें मला
एका मोठ्या दिवाणखान्यांत बसविलें, प्रारंभीं दासी
कडून उष्णोदकानें माझे पाय धुवविले आणि मजकरि-
तां भोजनाचें पात्र सिद्धकरून आणण्याविषयीं दासास
हुकूम केला. इतक्यांत तेथें भोजनाची यथास्थित तया-
री झाली. नानाप्रकारच्या पक्कांनानीं भरलेलीं सोन्याचीं
ताटें आणून मजपुढें ठेविलीं. त्याचप्रमाणें नानातऱ्हे
ची फळ फळावळ, अनेक तऱ्हेची मिठाई अशी सर्व
यथास्थित सिद्धता करून मजपुढें ठेविली. भोजनाचा
हा थाट पाहून माझे पंचप्राण तृप्त झाले. नंतर मीं
भोजनास प्रारंभ केला. प्रत्येक ताटांतील पदार्थांची
रुची घेतां घेतांच माझी तृप्ती झाली. आतां एक घांस
ही खाववत नाहीं असें झाल्यावर मीं आपला हात
आटोपला हें पाहून त्यानें मोठ्या दुराग्रहानें मला ह्मटलें
" महाराज आपण काय जेवलां ? हीं जीं ताटें आपणा-
करितां आणिलीं तीं तर सर्व तशींच राहिलीं आहेत.
तर महाराज कृपाकरून संकोच न धरितां यथास्थित
भोजन करावें. " नंतर मीं ह्मणालों कीं 'आहारीं व्यवहा-
रीं लज्जा काय उपयोगाची ? ईश्वर तुमचें कल्याण करो

माझ्या उदरामध्यें अन्न राहाण्याचा जेवढा भाग आहे तो भरून अगदीं तृप्त झालों. आपण जें मला भोजन घातलेंत त्याचें वर्णन करण्यास माझ्या जिव्हेचे अंगीं खरोखर शक्ति नाहीं. महाराज त्याचा स्वाद अद्याप पर्यंत माझ्या जिव्हेवरून गेला नाहीं, तर महाराज कृपाकरून हीं ताटें आतां उचलावीं ? नंतर ताटें उचलतांक्षणीं रुप्याचें तस्त व उष्णोदकानें, भरलेला सुवर्णाचा तांब्या दुसऱ्या एका सुंदर डब्यांत सुगंधी साबण ही सामग्री हात धुण्याकरितां सिद्ध होती. हात धुतेवेळेस एक सुंदर व स्वच्छ रुमाल हात व तोंड पुसण्याकरितां चाकरानें माझ्या आंगावर टाकिला. नंतर आम्ही तेथून दुसऱ्या दिवाणखान्यांत गेलों तेथें पाहातों तर ज्याचें मोल करवणार नाहीं, असे सुंदर व तऱ्हेतऱ्हेचे गालिचे हांथरले होते. त्याप्रमाणें बसण्याकरितां सुंदर व किनखापाचे गदेले व टेंकण्यास किनखापाचे अभ्याचे व ज्यांच्या बाजूस मोत्यांच्या झालरी लावल्या आहेत असे लोड क्रमानें ठेविले होते. हिरे जडित अत्तर दाण्या पानदाण्या गुलाबदाण्या एक रत्न जडित पात्रांत सुरेख व सोनेरी वर्खाचे विडे वगैरे सामान जेथच्या तेथें यथास्थित ठेविलें होतें. अशा थाटानें पानसुपारी वगैरे खाल्ड्यावर मला गुलाब अत्तर दिलें व करमणुकेसाठीं गोष्टी बोलूं लागलों. सुगंधाच्या भपक्यानें व त्या बिछाइतीच्या लोकोत्तर देखाव्यानें आमचा दिवस केव्हां गेला याचें मला भान सुद्धां राहिलें नाहीं. संध्याकाळ झाल्यावर हांड्या

झुंबरें वगैरेचा जिकडे तिकडे चकचकाट इतका झा-
ला, कीं ही रात्र आहे किंवा दिवस आहे याचें सुद्धां निदान करवेना. जागो जागीं अत्तरांचे फाये सुवासीक पुष्पांचे हार गुलछबू, गुलाब, पाण्याचे बैठे कारंज्याचे फवारे, आणि नाना प्रकारच्या उदबत्या; यांच्या अपरंपार धमघमाटामुळें हा अमक्या पदार्थाचा वास असें ओळखतांच येईना. याप्रसंगीं गंध परिक्षेचा खरा धर्म नाकानें सोडून दिल्हा अशी देखील कल्पना उद्भवली. रात्रीचें भोजन झाल्यावर आम्ही उभयतां पुनः गोष्टी सांगत दिवाणखान्यांत बसलों. कांहीं वेळानें एक सेवक येऊन मला ह्मणाला " महाराज, शयनगृहांत चलावें सर्व सिद्धता केली आहे." नंतर मी तो थाट पाहून ह्मणालों," महाराज आह्मासारख्या फकिरांस असली मिजाश कशाकरितां पाहिजेत. एक हातरी किंवा मृगचर्म आह्मां सारिख्यांस पुरे आहे कारण आपल्यासारख्या राजविलास्यांनीं हीं सौख्यें भोगावीं व ईश्वरानें आपणा करितांच हीं सर्व सौख्यें निर्माण केलीं आहेत."

तेव्हां त्यानें उत्तर केलें, " महाराज ह्या सर्व वस्तू प्रवाशा करितांच ठेविल्या आहेत, ह्या कांहीं आह्मा करितां किंवा आमच्या नव्हत." त्याच्या अतिशय आग्रहास्तव मीं जाऊन त्या बिछान्यावर पडलों. मला तो बिछाना लोण्यापेक्षांही मृदु लागला. त्यावर पुष्पांची शय्या केली होती व चोहोंवाजूस सुगंधीक तेलाच्या समया जळत होत्या, याच प्रमाणें दोहोंबाजूस अनेक

तऱ्हेच्या पुष्पांचे कमालखानीं हार लाविले होते, अगरबत्त्या अंबरबत्त्या चोहोंबाजूस जळत होत्या. नानातऱ्हेचीं रमणीय चित्रें भिंतींवर लाविलीं होतीं, मी ज्या ज्या बाजूस वळत असे त्या त्या बाजूस अनेक निरनिराळे पदार्थ माझ्या दृष्टीस पडत, व सुगंधानें तर मीं केवळ छाकल्याप्रमाणें गुंग झालों होतों. अशा रितीनें मी सुखांत निद्रा घेतली. प्रातःकाळ होतांच त्या मनुष्यानें नाना तऱ्हेचीं फळें मिठाई सरबतें वगैरे जशी हवी तशी माझ्या न्याहारीची सिद्धता केली. या प्रमाणें मीं आनंदांत तीन दिवस व तीन रात्री काढिल्या व चवथ्यादिवशीं मी जाण्यास्तव त्याच्या जवळ परवानगी मागितली. तो मनुष्य मोठ्या नम्रतेनें हात जोडून ह्मणाला, “ महाराज कदाचित् मजकडून आपल्या सेवेंत कांहीं न्युनत्व पडलें असेल ह्मणून आपण नाखुष झालां व जाण्याची त्वरा करितां असें मला वाटतें.” अहाहा! काय गरिबाविषयीं उदारता ही !! असो, मीं मोठें आश्चर्य करून त्यास ह्मणालों “ महाराज ईश्वराकरितां तरी आपण असें ह्मणूं नका, कारण आपण माझा पाहुणचार कशारितीनें ठेविलात ह्याचें वर्णन करण्यास माझे जिव्हेचे अंगीं शक्ति नाहीं, असें असतां उलटा आपण आपणावरच कसा दोष घेतां ? आणि खरोखर पाहुणचाराविषयीं ह्मणाल तर राहाणारानें तीन दिवसच राहिलें पाहिजे, त्याप्रमाणें मी राहिलों. आतां यापेक्षां अधिक राहाणें हें अगदीं अयोग्य आहे; तशांत मी केवळ प्रवासाकरितांच निघालों

आहे, तेव्हां एकाच ठिकाणीं फार दिवस राहून माझा प्रवास कसा बरें होईल? याकरितां मी आपल्यापाशीं जाण्याची परवानगी मागतों. आपल्या ह्या ममताळु स्वभावानें माझें मन अगदीं अकर्षून घेतलें आहे, व येथून जावेंसें वाटत सुद्धा नाहीं; परंतु निरुपायानें जाणें भाग आहे.

हें माझें शेवटचें भाषण ऐकून तो मला ह्मणाला; "महाराज, आपल्या मर्जीस वाटेल तसें करा; परंतु अंमळसें थांबा, ह्मणजे मी ही सर्व हकीगत बादशाहाजादीस जाऊन सांगतों; आणि ज्याअर्थीं आपण जाऊं इच्छितां, त्याअर्थीं दिवाणखान्यांत असलेलें सोनें, रुपें, जडावाचे वगैरे अलंकार व पात्रें, तसेंच त्रिछायतीचें व रोशनाईचें वगैरे जेवढें सामान आहे, तें सर्व आपलेंच आहे. ज्याप्रमाणें आपण आज्ञा कराल त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास मी सिद्ध आहें." हें ऐकून मी त्यास उत्तर दिलें, "महाराज, हें काय बोलतां मजसारख्या फकीरास हें ऐश्वर्य कशास पाहिजे? आह्मास कायती चालत्या दिवसाची पंचाईत! मला जर याचा लोभ असता, तर सर्वसंग परित्याग करून फकीर तरीं कां झालों असतों? ज्या अर्थीं सर्व सोडून वैराग्य धरिलें, त्याअर्थीं हें सर्व ऐश्वर्य तृणासारखें आहे" हें माझें विरक्त भाषण ऐकून तो तरूण मायाळु गृहस्थ बोलला.— "महाराज, आपण या सर्व वस्तूंचा स्वीकार न करितां गेलां, असें जर आमची बादशाहाजादी ऐकेल, तर माझी खात्री आहे कीं, ती मला या कामावरून बर्तर्फ

करील इतकेंच नव्हे, कदाचित् याहून ही एकादी भयंकर शिक्षा देईल कीं काय परमेश्वर जाणे ! ! महाराज, आपणास या सर्व वस्तूंविषयीं बेपर्वा असली; तथापि माझ्या बचावासाठीं माझी एवढी तरीं विनंति मानावी.—ह्या सर्व जिनसा एका खोलींत ठेऊन बंद कराव्या व दारावर आपण आपल्या नावाचा शिक्का करावा." मी तें घ्यावयास कबूल करीत नव्हतों ; तो ही आपला आग्रह सोडीना ; शेवटीं निरुपाय होऊन त्याणें वर सांगितलेली युक्ति मला कबूल करणें भाग आलें. मी त्या सर्व वस्तु एका खोलींत घालून दारास कुलूप लाविलें व त्यावर मी आपल्या नांवाची मोहोर केली. हा गृहस्थ मला जाण्यास परवानगी देतो ह्मणून जो मी विचार करीत बसलों आहे. तों एक सुंदर खोजा, डोक्यास जरीचा शेला, कंबरेस सोन्याचा कंबरपट्टा, अंगांत एक उंची झगा व हातांत रत्न-जडित काठी घेऊन कित्येक खिजमतगारांसह मोठ्या डौलानें मजजवळ आला; व त्याणें इतक्या सफाईनें व खुबीनें मजजवळ भाषण केलें कीं; त्याचें वर्णन सुद्धां माझ्यानें करवत नाहीं. तो ह्मणाला.—"महाराज, कृपा करून आपली पायधूळ या पामराचे घरीं झाडावी, आपल्या सारख्याचे पाय लागल्यानें माझें घर पवित्र होऊन मला ही आनंद होणार आहे. या गावांत एक प्रवासी आला होता व त्याचा आदर सत्कार न होतां तो तसाच परत गेला, असें जर आमची धनीण ( राजकन्या ) ऐकेल, तर मला काय शिक्षा होईल

परमेश्वर जाणे ! तिची मजवर इतराजी झाल्यावर माझ्या आयुष्यांतले राहिलेले दिवस मला मोठ्या दुःखांत काढावे लागतील." मी त्याच्या गोष्टीकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं, तथापि त्याच्या त्या नम्र भाषणानें माझ्या मनास जिंकिल्यामुळें अगदीं निरुपाय झालों. नंतर त्याणें मला दुसऱ्या एका घरांत नेलें, तें तर पूर्वीच्या घरापेक्षांही सर्वोत्कृष्ट होतें. तेथें मला पूर्वी प्रमाणेंच अभ्यंगस्नान, भोजन, शयनस्थल वगैरे उत्तम उपभोग मिळाले. त्या ही ठिकाणीं मी तीन अहो रात्री वास केला. चवथ्या दिवसीं तो मला ह्मणाला; "महाराज, हीं रत्नजडित व सोन्या रूप्याचीं भांडीं व गालीचे वगैरे त्रिछायती सामान या सर्वांचे आपणच धनी अहां. आपणास ह्या सर्वांचें जें कांहीं कर्तव्य असेल तें करावें."

हें त्याचें चमत्कारिक भाषण ऐकून मी अगदीं गोंधळलों व कोणत्या तरी उपायानें येथून आपली सुटका करून घेऊन आपले प्राण वाचवावे, नाहीं तर येथील रंग ठीक दिसत नाहीं; अशा माझ्या मनांत अनंत कल्पना घोटाळूं लागल्या. अशा विचारांत गढलेली माझी उदास मुद्रा पाहून तो खोजा मोठ्या नम्रतेनें ह्मणाला, "महाराज उदास होण्याचें कांहीं कारण नाहीं, आपली जी इच्छा असेल, ती प्रशस्त मनानें सांगा, ह्मणजे त्याप्रमाणें जाऊन राजकन्येस निवेदन करितों." तेव्हां मी त्यास उत्तर दिलें, "आपण ह्मणतां हें सर्व खरें; परंतु या फकीरी वेषाला

ऐहिक सुखोपभोगांची इच्छा धरणें योग्य होईल काय? नाहीं तर मी न मागतां आपण देण्यास तयार आहां; परंतु गरजे वांचून इच्छा कशी उपजेल?" नंतर तो मला ह्मणाला, "महाराज, इच्छारहित कोण आहे? सुंदर स्त्री, सुवासिक पुष्प आणि द्रव्य या तीन वस्तूपासून अंतःकरण परावृत झालें, आहे असा पुण्यश्लोक कोण असेल तो असो! लोभाला ज्याणें जिंकिलें, तो सर्व जगास अजिंक्य असें समजलें पाहिजे. याविषयीं एक कवि ह्मणतो.

श्लोक.

सदा ऊर्ध्व बाहू जटाधारि योगी, यती मौनधा-
री धरी भस्मअंगी ॥ महावीर हो शूर आणी
गुणी ते, बहू पाहिले नाहीं निर्लोभ धीतें ॥ १ ॥

हें त्याचें वाक्य ऐकून मी ह्मणालों, " आपण ह्मणतां हें सर्वस्वी खरें आहे; परंतु मला या धन द्रव्या पैकीं कांहींएक नको, पण आपण जर परवानगी द्याल, तर मी एक पत्र लिहून देतों तेवढें कृपाकरून राजकुमरीस पावतें करावें. ह्मणजे तेणेंकरून माझ्या सर्व इच्छा त्यांस विदित होतील. एवढो मेहेरबानी केल्यानें मला या जगांतील सर्व वस्तू दिल्या सारखें होऊन मी आपला फार आभारी होईन. " या माझ्या बोलण्यास त्या षंढानें मोठ्या आनंदानें संमती दिली. नंतर मी तत्काल पत्र लिहिण्यास प्रारंभ केला; प्रथम ईश्वराची स्तुतिकरून नंतर मी आपला संपुर्ण इतिहास लिहिला. व पुढें कार्याकडे कलम वळविलें. असें लि-

हिलें कीं; " हा ईश्वरानें उत्पन्न केलेला प्राणी कांहीं दिवसां पूर्वीं आपल्या या शहरांत आहे व त्याच्या विषयीं आपल्या उदार व दयालु कामगारांनीं उत्तम प्रकारची काळजी वागवून बंदोबस्त ठेविला. धार्मिकता व औदार्य याविषयींची आपली कीर्ति ऐकून, आपल्यास समक्ष पाहावें अशी मनामध्यें इच्छा उत्पन्न होऊन तेवढ्या करितां येथें आलों आहें, तर इतकी इच्छा पूर्ण केल्यास मी आपला फार आभारी होईन. व जें कांहीं आपण मला द्रव्य द्याल, त्याच्या शतगुणित या देणगीनें मी तृप्त होणार आहें. ज्या अर्थीं आपले कारभारी मला ह्मणतात कीं; मला जी इच्छा असेल ती निःशंकपणें आपल्या पुढें मांडावी, त्याअर्थीं मी आपणास निशंकपणें विनंती करितों कीं; मला कांहीं धन दौलत पाहिजे असें नाहीं, कारण मीही थोड्याशा पृथ्वीचा राजा आहें, परमेश्वर कृपेनें कोणत्याही गोष्टीची न्युनता आहे असें नाहीं; परंतु मी आपलें राज्य, ऐश्वर्य व वैलासिक सुखें सोडून व अंनत संकटें भोगून एकटा फकीराच्या वेषानें येथें आलों, याचा हेतु केवळ आपलें दर्शन घ्यावें एवढाच आहे, तर आपण कृपाळू होऊन माझी आज्ञा पूर्ण कराल अशी मी उमेद धरितों. शेवटीं इतकें सांगितलेंच पाहिजे कीं; या हतभाग्याची इच्छा पूर्ति न झाल्यास शपथपूर्वक याला कोणत्याही प्रकारानें सुख व्हावयाचें नाहीं, इतकेंच नव्हे, तर याचें अवशिष्ट राहिलेलें आयुष्य जीवंत असून मेल्यासारखें होणार आहे. भुवनैक सुंदरि राजकन्ये, फार काय सांगू ? मजनु व

फरहाद याप्रमाणें माझ्या आयुष्याचा शेवट एकाद्या अरण्यांत किंवा डोंगरांत होईल हें तूं आपल्या सदय अंत:करणांत पक्केपणीं ठेव."

याप्रमाणें मी माझ्या इच्छानुरूप पत्र लिहून राजकुमारीस देण्याकरितां त्या खोजाच्या हातीं दिलें. तो तें पत्र घेऊन गेला व कांहीं वेळानें परत येऊन मला हाक मारून त्याणें आपल्या बराबर नेलें. मी त्याजबराबर सुमारें जनानखान्याच्या दारापर्यंत गेलों, तेथें पहातों तों एका रमणीय दिवाणखान्यांत एक उतार वयाची प्रतिष्ठित बाई, रत्नजडित अलंकार व भरजरी वस्त्रें परिधान केलेली एका सुवर्ण चौरंगावर बसलेली माझ्या दृष्टीस पडली. तिच्या समोर दुतर्फा अनंत दासी व खोजे यांच्या पंक्ती हात जोडून उभ्या होत्या. या थाटावरून या सर्व ऐश्वर्याची स्वामीणी हीच; असा माझा ग्रह झाला व मोठ्या नम्रतेनें मी तिला सलाम केला. व तिणेंही मोठ्या सौम्यतेनें माझा सलाम घतला. मला दासीकडून एक सुवर्ण चौकी बसावयास आणून देववून गंभीर मुद्रेनें ह्मणाली.– " बसावें महाराज, कसें काय बरें आहेना, दगडासही द्रव येण्यासारखें सुंदर पत्र नुकतेंच राणी सरकारास आलें, तें आपणाकडूनच असेल वाटतें ? " हें ऐकून मला "होय" ह्मणण्यास लज्जा वाटली ह्मणून एक चकार शब्दही न बोलतां खालीं पहात उगाच बसलों.

कांहीं वेळानें आपण होऊनच ती वृद्ध बाई मला ह्मणाली.–अरे तरुण पुरुषा, राजकुमारीनें तुला सलाम

सांगून निरोप सांगितला आहे कीं; "लग्न करूं नये अशी कांहीं माझी शपथ नाहीं आणि ज्या अर्थी अन्योक्ती-च्या रूपानें आपण मजबरोबर लग्न करूं इच्छितां, त्या अर्थी मी फार आनंदी आहें; परंतु पत्रांत लिहिलेला मजकूर आपणा सारख्या विचारी पुरुषांस किंचित् अ-योग्य आहे. कारण जे सर्व प्राणी आहेत, ते ईश्वराच्या दृष्टीनें सर्व सारखेच होत. जरीं ते कोणत्याही धर्म-संबंधानें, हुद्यानें किंवा संपत्तीनें श्रेष्ठ असले, तरीं सा-रखेच समजले पाहिजेत. कोणाचें भाग्य कोणत्या वेळेस उदयास येतें याचा काय नियम? संपत्ती ही दोन प्रहरची सावली आहे. असो, मी ही पुष्कळ दिवसांपासून लग्नाची इच्छा करितें, आणि ज्याप्रमाणें आपण आपल्या संपत्तीविषयीं बेपर्वा आहां, त्याचप्रमाणें ईश्वरानें मलाही इतकी संपत्ती दिली आहे कीं; तिची गणना सुद्धां होणें नाहीं. परंतु माझी एक अट आहे, तेवढी पूर्ण करून व राजकुमारीच्या बहुमानाप्रमाणें आपण हुंडा* (महर) द्याल, तर मग सर्व कार्यसिद्धि होईल." याप्रमाणें त्या वृद्ध स्त्रियेनें हें राजकुमारीचें संभा-षण मला सांगितलें. त्यावर मी उत्तर दिलें कीं; "बाईसाहेब, राजकुमारीचें सर्व बोलणें मला कबूल आहे. आणि तें पूर्ण करण्यास मी माझ्या संपत्तीची, कुटुंबाची किंबहुना प्राणाचीही परवा बाळगणार नाहीं. आतां एकदां कृपाकरून कोणती अट आहे तेवढी सांगा पाहूं?" हें माझें आतुर भाषण ऐकून ती वृद्ध बाई

* राजकुमारीची जी कांहीं अट होती तीच हुंडा होय.

ह्मणाली "अरे तरुण पुरुषा, उतावळा होऊं नको, आजचा दिवस मुक्काम कर, उद्यां सर्व तुझ्या समजण्यांत येईल." हें तिचें अश्वासन स्वीकारून तिजपाशीं जाण्यास परवानगी मागितली व बाहेर आलों.

याप्रमाणें सर्व दिवस गेल्यावर संध्याकाळीं एक खोजा आला व त्याणें मला एका सुंदर दिवाणखान्यांत नेलें. तेथें पहातों तों मोठमोठाले श्रीमंत, विद्वान, धर्मशील आणि ईश्वरी नियमांत निपुण असे मोठे साधू बसले होते. मी तेथें जाऊन बसल्यानंतर कांहीं वेळानें भोजनाची सर्व सिद्धता झाली, मला क्षुधा नव्हती, तरी शिष्टाचारार्थ मीही त्या सर्वांबरोबर भोजन केलें. त्या खोजाच्या व त्या सभ्य लोकांच्या अत्याग्रहामुळें भोजन झाल्यावर जनानखान्याच्या मध्य घरांतून एक दाई बाहेर आली—आणि इकडे तिकडे पाहून "**बहरूर** कोठें आहे?" ह्मणून मोठ्यानें ह्मणाली. हे शब्द तिच्या तोंडांतून निघतात न निघतात तोंच तेथें हजर असलेल्या चाकर माणसांनीं त्या मनुष्यास तत्काल हजर केलें. त्याच्या पोषाखावरून, आकृतिवरून व गंभीरतेवरून तोही मोठा सभ्य दिसत होता. त्याच्या कंबरेस कित्येक सुवर्णाच्या व रुप्याच्या किल्या होत्या. तो येतांक्षणीं मला सलाम करून मजजवळ बसला. नंतर तीच दाई येऊन त्यास ह्मणाली "**बहरूर**, तूं जें कांहीं पाहिलें असशील किंवा ऐकिलें असशील तें सर्व इत्थंभूत या तरूण पाहुण्यास कथन कर. ही दाईची आज्ञा होतांच **बहरूरानें** कथा सांगण्यास प्रारंभ

केला. तो ह्मणाला.—“ महाराज, आमच्या या बाद-शाहाजादी सरकारचे तैनातीस जे गुलाम आहेत, त्यांतीलच हा एक आहे. बहुधा सर्वांस परदेशीं व्यापार करण्याचा उद्योग आहे. व त्यांणीं पाहिलेल्या ठिका-णच्या रीतिभाती राजकन्येस सांगाव्या असा हुकूम आहे. त्याप्रमाणें हा एक नीच व आज्ञाधारक गुलाम निमरोज शहरास गेला होता. तेथें असें दृष्टीस पडलें कीं ; तेथील ग्रामस्थ लोक काळीं वस्त्रें परिधान करून धायधाय रोदन करिताहेत. त्यांच्या या स्थि-तीवरून त्यांच्यावर कांहीं मोठें संकट असावें असें मला वाटलें व त्या शंकेच्या समाधानार्थ मी पुष्कळांस प्रश्न केले ; परंतु एकाही मनुष्यानें मला खरें कारण सां-गितलें नाहीं. कांहीं दिवस गेल्यावर ते एके दिवशीं तेथील लहानथोर रहिवासी लोक प्रातःकाळीं निघून शहराबाहेर एका मैदानांत आले. नंतर कांहीं वेळानें आपल्या मानकऱ्यांसह घोड्यावर बसून राजाही तेथें आला. व सर्व लोकांस सारखें उभें करून समोरच्या मार्गाकडे पहात स्तब्ध उभा राहिला. मी ही त्या लोकांतच उभा राहिलों होतों. सर्व लोकांच्या त्या वेळच्या चर्येवरून ते कोणाची तरी मार्ग प्रतीक्षा क-रीत आहेत असें दिसलें. नंतर एका तासानें एक मदनासारखा रूपवान् व वयानें पंधरा किंवा सोळा वर्षांचा असा सुंदर पुरुष, मोठ्यानें ओरडत एका जर्द्या बैलावर बसून येत आहे व त्याच्या तोंडांत फे-साचा गोंडा आला आहे असें मी पाहिलें. तो तरुण

पुरुष मैदानांत आल्या नंतर बैलावरून उतरून ज-
मिनीवर बसला. त्यानें आपल्या एका हातांत बैलाची
दोरी व दुसऱ्या हातांत नागवी तलवार घेतली होती.
त्याच्या बरोबर एक रूपानें सुंदर असा खिजमतगार
होता, त्याच्या हातांत त्या तरूणानें आपला सर्व सरं-
जाम दिला व तो त्या खिजमतगारानें सर्व लोकांस
दाखविला. त्यावेळीं जो जो मनुष्य त्या सरंजामाकडे
पाही तो मोठयानें आक्रोश करी हा चमत्कारिक
प्रकार पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. मग तो
खिजमतगार त्या तरूण पुरुषाजवळ जातांच तरूणानें
आपल्या तलवारीनें त्याचें डोकें उडविलें; व लागलाच
बैलावर बसून ज्या मार्गानें आला, त्याच मार्गानें मोठ्या
जलदीनें निघून गेला. तो अदृश्य होईपर्यंत सर्व
लोक तेथेंच स्तब्ध उभे राहिले होते. व कांहीं
वेळानें परत आपापल्या घरीं आले. मी मोठ्या उ-
त्कंठेनें व नम्रपणानें प्रत्येकास याचें कारण विचारिलें
कित्येकांस द्रव्याचीही आशा दाखविली; परंतु
एकानें ही माझें समाधान केलें नाहीं. मी सर्वांस
ह्मणालों, 'मी कांहीं अधिक विचारीत नाहीं, हा मनुष्य
कोण, याणें त्या खिजमतगारास मारिलें तें कशासाठीं;
आला कोठून व पुनः गेला कोठें.' महाराज माझ्या
इच्छा, विनवण्या आणि युक्ति कांहीं एक उपयोगीं
पडल्या नाहींत. मी प्रवासाहून परत आल्यानंतर
बादशाहाजादीस हा सर्व वृत्तांत सांगितला. व त्या
दिवसापासून याविषयीं शोध करून खरें कारण सम-

जून घेण्याची तिच्या अंत:करणास मोठी चटपट लागली आहे. आणि त्याकरितांच तिणें याचें खरें कारण सांगण्याची लग्नसंबंधी अट ठेविली आहे. जो भाग्यवान् पुरुष या प्रकाराचा शोध लावून तिला सांगेल, तोच तिच्या या अप्रतिम वैभवाचा, अगणित संपत्ती व अनुपम सुंदर व नाजूक शरीराचा मालक होईल."

याप्रमाणें प्रतिज्ञेची कथा सांगून त्याणें आपलें भाषण पुरें केलें व मला ह्मणाला; "महाराज, आपण सर्व वर्तमान ऐकिलें आहे, तर आतां या गोष्टीचा पूर्ण विचार करून आपल्या हातून होण्यासारखें असेल तर अवकाश न करितां **निमरोज** शहरचा मार्ग धरावा; किंवा सर्व संकल्प सोडून देऊन आपल्या देशास परत जावें." हें सर्व भाषण ऐकून मी ह्मणालों "ईश्वर कृपेनें मी या चमत्कारिक गोष्टीविषयीं निर्णय करून सहस्र हिशांनीं जय घेऊन येईन अशी माझ्या मनोदेवतेची खात्री आहे. नशिबाच्या कमीपणामुळें आयुष्याचीच समाप्ति झाली, तर मात्र निरूपाय आहे; परंतु बादशहाजादीनें आपल्या वचनांत काडीइतकें अंतर आणणार नाहीं, असें मला अभिवचन दिलें पाहिजे. आणि मला जवळ बोलावून पडद्याच्या बाहेरून मी जे प्रश्न करीन, त्यांचीं उत्तरें स्वमुखानें दिलीं पाहिजेत. असें झालें ह्मणजे माझें अंत:करण तृप्त होऊन पुढच्या सर्व साहस कर्मांस मला उमेद येईल."

ही माझी विनंती, त्या दासीनें बादशहाजादीस सर्व कथन केली व तिणेंही मोठ्या प्रेमानें आपल्या

जवळ येण्यास मला हुकूम केला. कांहीं वेळानें त्याच दासीनें येऊन बादशहाजादी ज्या दिवाणखान्यांत होती, तेथें मला नेलें. त्या ठिकाणीं पाहिलेल्या थाटाचें वर्णन मी काय करूं? तेथें दाहों बाजूंस क्रमानेंच हात जोडून सुंदर, तरुण व अमूल्य अलंकार युक्त अशा अनंत सख्या ( विश्वासू दासी ) उभ्या आहेत, स्तुतिपाठ करणाऱ्या स्त्रियांची आणि **काश्मिरी** स्त्रियांचीं पलटणें (यालाच चेपली पलटन ह्मणतात) क्रमानेंच उभीं होतीं. या सर्व स्त्रिया जवाहिरानें मढवूनच काढल्या आहेत कीं काय असा भास होई. मित्रहो सांगितला हा यःकश्चित बटकींचा थाट ! खासा स्त्रियांचें तर वर्णनच करवत नाहीं. मी त्या अद्भुत चमत्कारानें इतका भ्रमिष्ट झालों कीं; मला माझ्या स्थितीचें अनुमान देखील करण्यास शक्ति राहिली नाहीं. एकदां वाटे मी स्वप्न पहातों काय ? पुनः वाटे, छिः आपण बादशहाजादीच्या महालांत आहों. अशा अनेक कल्पनांनीं व्याप्त होत्साता पुढच्या स्थितीविषयं अगदींच असमर्थ झालों; आश्चर्य आनंद आणि परिणामाची भीति, ईहींकरून अंगास दरदरून घाम, रोमांच कंठ सद्गदित होऊन गेला. पुढें जाण्यासही धैर्य होईना, तथापि मोठया शिकस्तीनें त्या सर्व विकाराचें सहन करून पुढें जाण्याचा निश्चय केला; परंतु एकेक पाय शंभर शंभर मण वजनाचे आहेत असें वाटूं लागलें, जिला पहावें तिला सोडून पुढें जावें असें वाटेचना. अशा थाटांतून मोठया संकटानें मी पुढें

चालिलों. जातां जातां एका ठिकाणीं, ज्याला चोहोंबा-जूस मोत्यांच्या झालरी लागल्या आहेत असा एक कि-नखापी चिकाचा पडदा लोंबत होता. व त्याच्या जवळ एक रत्नजडित चौरंग व एक चंदनाची खुर्ची ठेविली होती. जी दासी मला नेण्यास आली होती, तिणें मला त्या चौरंगावर बसण्यासाठीं डोळ्यानें इषारा केला. मी चौरंगावर बसल्यानंतर ती त्या चौकीवर बसली व मला ह्मणाली; “ महाराज, आपणास जें कांहीं बोलावयाचें असेल, तें आतां मन मोकळें करून बेलाशक बोलावें. बादशहाजादी आपल्या मुखांतील मंजुळ शब्द ऐकण्यास फार आतूर होऊन आंत बस-ली आहे.

प्रारंभी तिच्या उत्तम, गुणांची, न्यायाची व औ-दार्याची प्रशंसा करून अंत:करणांतील हेतु सांगण्यास प्रारंभ केला. मी ह्मणालों; “ जेव्हांपासून मी या प्रां-ताच्या सरहद्दींत प्रवेश केला, तेव्हांपासून मी पहातों तर प्रत्येक मुक्कामीं मोठमोठया धर्मशाळा व राजवि-लासी मंदिरें बांधून त्यांत खाण्यापिण्याच्या, वगैरे राज-विलासी सर्व सोई प्रवाशांकरितां करून ठेविल्या आहेत, असें मी पाहिलें. प्रत्येक मुक्कामीं माझें तीन तीन दिवस रहाणें झालें, तितक्या काळांत मी जीं सुखें अनुभविलीं यांचें खरोखर वर्णन करण्यास मी समर्थ नाहीं. को-णत्याही ठिकाणाहून मी जाण्यास निघाल्यावर तेथील अधिकाऱ्यानें मला आग्रह केला नाहीं असें घडलेंच नाहीं. शेवटीं माझ्या आदरातिथ्याकरितां असलेल्या

सरंजामाचा अधिकाऱ्याच्या अत्याग्रहानें स्वीकार करून तें सर्व सामान कुलपांत घालून वर मोहरा केल्यावांचून माझी एकाही ठिकाणाहून सुटका झाली नाहीं. आतां आपल्या नगरांत नव्या नवसाचा मी एकटाच प्रवासी आलों असें नाहीं, तर मजसारखे सहस्रावधि येत असतील व येतांहत हें मी पाहिलें ही आहे, तर सर्वांशीं असें औदार्य ठेवण्यास कुबेर देखील पुरणार नाहीं मग दुसऱ्याची काय कथा आहे? असें असतांहि आपण टिकलां आहां याचें मला फार आश्चर्य वाटतें. कारण बादशाहाजादीचें राज्य पाहूं गेलें तर त्याचें उत्पन्न एक दिवसाच्या खर्चा पुरतें ही असेल किंवा नाहीं याची मला शंकाच आहे. यासाठीं या संपत्तीचें मूळ कारण कृपाकरून बादशाहाजादीनें आपल्या मुखानें सांगावें, ह्मणजे माझें अंत:करण स्थिर होईल व मीहि तत्काल **निमरोज** शहरास जाण्याची तयारी करीन, आणि आशा बाळगितों कीं; सांगितल्या गोष्टीचा शोध करून फार थोड्या कालांत आपणास निवेदन करण्यास येईन. व पुढचा काल मोठ्या आनंदांत घालविण्याची संधी सांपडेल."

माझे मनोवेधक शब्द ऐकिल्याबरोबर पडद्याच्या आंतून अंत:करणास थिजवून टाकणारा असा मंजुळ ध्वनि माझ्या कानीं लागला. मित्रहो, काय सांगू? उपमाही नाहीं! फारच गोड! त्या शब्दानें माझें मन एका निमिषांत आपणाकडे ओढून घेतलें. मला वाटे पुराणांतली वर्णिलेली रतीच मजपाशीं बोलते काय?

किंवा जगाला सौख्य देणारी लक्ष्मीच मला हाक मारिते आहे काय ? अशा एक का दोन ! अनंत कल्पनांनीं माझ्या अंत:करणावर आपापल्या शक्यनुरूप हल्ले केले; परंतु शेवटीं कथा संदर्भ शस्त्र घेऊन राजकन्याशब्दग्रह जेव्हां पुढें झाला, तेव्हां बाकी सर्वांस मागें हटावें लागलें. बादशाहाजादी मला ह्मणाली. " हे तरुण राजपुत्रा, आपल्यास याविषयीं खरें कारण ऐकण्याची इच्छा असेल, तर आपल्यास आजचा दिवस मुक्काम करावा लागेल. मी संध्याकाळीं आपणास बलाविण्यास पाठवीन व त्यावेळीं या संपत्तीची सर्व कथा नि:संशय आपणास निवेदन करीन. " याप्रमाणें निश्चय झाल्यावर मी तेथून निघून आपल्या बिऱ्हाडीं आलों. व संध्याकाळ केव्हां होईल व मला तें कारण केव्हां समजेल याजविषयीं निदिध्यास करीत बसलों. मला वाटे, आजचा दिवस वाढला कीं काय ? कदाचित् या राजकन्येच्या अपार संपत्तीकडे पहाण्यांतच सूर्य गुंग झाला नसेल ना ? अशा कल्पनांत मी आहे इतक्यांत सूर्यास्त होऊन विरही व प्रवासी लोकांच्या दु:खांचें पूर्वांग जें नक्षत्र दर्शन, तें मला झालें. मी मोठ्या आनंदानें मार्ग प्रतीक्षा करीत आहें, इतक्यांत एक खोजा किनखापी सरपोसांनीं आच्छादलेलीं सोन्याचीं ताटें चाकरांच्या डोक्यांवर देऊन बरोबर घेऊन आला व तीं सर्व ताटें मजपुढें ठेवून व मला मोठ्या अदबीनें सलाम करून ह्मणाला, "महाराज, बादशहाजादीनें खासगी भोजनांतून हें आपणाकरितां पाठविलें

आहे, तर कृपाकरून आपण याचें सेवन करावें असें ह्मणून त्याणें ताटांवरील मोत्यांच्या झालरीचे किनखापी सरपोस काढविले. तीं आच्छादनें काढतांच जो कांहीं मधुर सुगंध सुटला, त्याणेंच माझी तृप्ती झाली तथापि त्या खोजाच्या आग्रहामुळें त्यांतील माझ्यानें जेवढें खाववलें तेवढें खावून बाकी सर्व ताटें त्या खोजाच्या स्वाधीन केलीं. आहाहा ! काय बहारीचा दिवस तो ! निशापती चंद्रमा, आपल्या अगणित तारांगणांसह आकाशांत विराजमान झाल्यानें त्याचें शांत तेज विलासी जनास आनंद आणि विरही व प्रवासी जनास दुःख देऊं लागलें आहे, अशा मौजेच्या वेळीं एका खुपसुरत दासीनें येऊन बादशहाजादीचें बलावणें कळविलें व मीही अगदीं अवकाश न करितां तिजबरोबर चालता झालों.

मी तिजबरोबर बादशहाजादीच्या मंदिरांत गेलों. तेथील शोभा काय सांगूं ? मागील थाटावरून तुमच्या लक्षांत असेलच, तेव्हां आतां अधिक सांगण्याचें कारण नाहीं. आंत प्रवेश करितांच तेथील उजेडानें माझे डोळे तत्काळ दिपून गेले. तेथें नानाप्रकारच्या चित्रविचित्र गालीचांची बिच्छाईत केली होती, तिजवर एक पृथ्वीपतीच्या गादीप्रमाणें किनखापी गादी व सुंदर एक जडावाची प्रभावळ तक्यासारखी टेकून ठेविली होती. शिवाय सामान्य मश्रु, अगाबान वगैरेच्या गाद्या आणि तशींच लोडें व तक्ये हेही अगणित मोठ्या बेताबातानें भिंतीशीं टेकून ठेविले होते. भिंती-

ला सुंदर सुवर्णाचा गिलावा केल्यानें त्या प्रत्यक्ष सोन्याच्या विटांच्याच आहेत असें वाटे. नानातऱ्हेच्या व विश्वकर्म्यासारख्या कारागिरांनीं बनविलेल्या तसबिरी लाविल्या होत्या; हांड्या व झुंबरें, यांचा अप्रतिम उजेड पडला होता. चार बाजूस चार हिऱ्यामाणकांचे वृक्ष ठेविले होते. त्यांच्या प्रकाशाविषयीं सांगून ऐकणारांची तृप्ति होईल असें वाटत नाहीं. त्यांचीं पानें शुध्द पाचूचीं, पण इतक्या सफाईनें केलीं होतीं कीं; जणू जगन्नियंत्यानें आपल्या करमणुकेकरितांच हे वृक्ष उत्पन्न केले आहेत, असें पाहाणारांस वाटत असे. त्याचप्रमाणें जडाव व शुद्ध सुवर्णाच्या अत्तरदाण्या गुलाबदाण्या, पानपरड्या, पिकदाण्या वगैरे मजलसी सामान यथायोग्य ठिकाणीं ठेविलें होतें. अनेक ठिकाणीं अंबरबत्त्यांचीं झाडें जळत होतीं, मंद शीतळ व नियमित वारा वहात असल्यामुळें सुगंधाचा घमघमाट सुटला होता. अप्सरांस ही लाजविणाऱ्या अशा नृत्य करणाऱ्या व गाणाऱ्या स्त्रिया व बीन, सतार, सारमंडळ वगैरे मनोहर वाद्यें वाजविणाऱ्या स्त्रिया आपापल्या नोकरीस प्रारंभ करण्याचा हुकूम मिळण्याकरितां दोन्ही बाजूस सारख्या पंक्तीनें तटस्थ उभ्या होत्या. हा देखावा पाहून माझी बुद्धी अगदीं गुंग होऊन गेली. तेव्हां मी त्या दासीस ( जिणें मला आणविलें. ) ह्मणालों "अहाहा ! काय सांगावें ! दिवसास पाहिलें तर निराळाच देखावा होता व रात्रींचा हा रंग ! मला वाटतें आज दिवसास ईद

( मुसलमानांचा एक सण ) व रात्रीं शबेबरात ( साबानच्या १४ व्या तारखेस मुसलमानाची पितृतिथि असते, त्या दिवसीं मोठी रोशनाई करण्याची चाल आहे. ) असें कांहीं आहे काय ? असा थाट प्रत्यक्ष सार्वभौम राजा जरी असला, तरी त्याच्यानें ही करवणार नाहीं. मग इतरांची काय कथा ? खरेंच सांगा, आजची रोशनाई कांहीं कारणानिमित्त आहे किंवा ही तुमची बादशाहाजादी दररोज असें करिते ? " तेव्हां ती दासी ह्मणाली, " महाराज हें तरकाय ? परंतु याच्यापेक्षां ही दररोज अधिक असतें. आपण येथें स्वस्थ मानसेंकरून बसावें; मी जाऊन बादशाहाजादीस आपण आल्याची वर्दी कळवितें. ती अंतल्या मंदिरांत आहे. " असें ह्मणून ती दासी निघून गेली व लागलीच परत येऊन मला ही तिणें आपल्या बराबर नेलें.

मी बादशाहाजादिच्या दिवाणखान्यांत जातांच त्या अद्भुत देखाव्यानें माझ्या मनाचें विलक्षण स्थित्यंतर झालें. द्वार कोणतें, भिंती कोणत्या, खांब कोणते याचा मला कांहींच अजमास लागेना; कारण सर्व मंदिरास आरसे जडले होते व त्यांच्या चौकटींस मोठ्या कौशल्यानें हिरे जडले होते; त्या परस्परांच्या प्रतिबिंबामुळें तें मंदिर सर्वच हिरे जडित आहे असा भास होई. एका बाजूस किनखापी बुटीदार पडदा लोंबत होता, व त्याच्या पलीकडे ती लोक सुंदरी बसली होती. दासीनें मला पडद्याजवळ बसावयास सांगून आपण

पलीकडे बसली व राजकन्येच्या आज्ञेप्रमाणें गोष्ट सांगण्यास प्रारंभ केला. ती ह्मणाली; "महाराज, स्वस्थ मानसें करून ऐका. या शहरचा राजा महान् पराक्रमी व संपत्तिमान् होता. त्याला सात कन्या होत्या, त्यांतील आमची ही धनीण अगदीं लहान होती. एके दिवशीं कांहीं उत्साहानिमित्त सातहीकन्या अमूल्य वस्त्राभरणांनीं भूषित होऊन मोठ्या थाटानें राजाच्या पुढें बसल्या होत्या. राजाची दृष्टी कन्यांकडे जाऊन आपल्या मोठेपणाच्या तोऱ्यांत त्यांस ह्मणाला." अहाहा काय सांगावें, मुलींनों, जर तुह्मीं माझ्या कन्या नसतां किंवा मी प्रारब्धहीन भिकारी असतों, तर तुह्मांला ही अवस्था व हें सौख्य प्राप्त होतें काय? तर तुह्मीं ईश्वराचे आभार माना व स्तुति करा. तुह्मीं आपणांस राजकन्या ह्मणवितां व त्याप्रमाणें हें सर्व सौख्य व ऐषआराम यांचा उपभोग घेतां, हें सर्व माझ्याच प्रारब्धानें तुह्मांस प्राप्त झालेलें आहे, व तीं सर्व सुखें एकट्या मजवरच अवलंबून आहेत असें समजा."

हें ऐकून वडील साहा कन्यांनीं राजाच्या बोलण्यास अनुमोदन दिलें; परंतु ही धाकटी राजकन्या राजाचें वाक्य कबूल करीना. ती आपल्या मनांत त्याच्या मूर्खपणाबद्दल आश्चर्य मानूं लागली. वडील सहाजणींचीं अशीं आर्जवांचीं उत्तरें झाल्यावर आमच्या धानिणीवर आपला अभिप्राय कळविण्याची पाळी आली. ही जरीं सर्वांत वयानें लहान होती, तरीं बुद्धीनें व विचारानें फार पोक्त होती; तिणें होय किंवा नाहीं

यांतून एकही पक्ष न स्वीकारतां मौन धारण केलें, तेव्हां बादशाहानें तिला ह्मटलें, "बेटा सर्व जणींनीं आपापला अभिप्राय कळविला, तरीं तूं कांहींच बोलत नाहींस याचें कारण काय बरें ?" बादशाहाचें हें भाषण ऐकून आमच्या शाहाजादीनें दोन्ही हात जोडून विनंती केली कीं; "महाराज, या अज्ञान कन्येला जर अभय असेल, तर ही बोलण्याविषयीं परवानगी मागत्ये आहे." राजा ह्मणाला, "बेटा, तुला बोलावयास कायबरें चिंता आहे ? बेलाशक इच्छेस येईल तें बोल." बादशाहाची परवानगी होतांच बादशाहाजादी ह्मणाली "पित्या आपण तर ज्ञाते, विचारी व सार्वभौम राजेच आहां, आपणास मी सांगावें असें नाहीं; परंतु थोडी सूचना करित्यें. आपणास माहित आहेच कीं; खरें भाषण मनुष्यास मोठें कडू लागत असतें; तथापि मी या सर्व उपभोगांस मुकल्यें असें मानून विनंती करित्यें. महाराज, मनुष्यमात्राच्या भालपटलावर विधात्यानें जें कांहीं लिहिलें असेल, तेंच घडावयाचें. त्यामध्यें कमी किंवा जास्त करण्यास कोणी ही शक्य होत नाहीं. त्याचप्रमाणें माझ्या प्रारब्धीं जें लिहिलें असेल, तें कोणाच्यानें ही फिरविलें जाणार नाहीं. तें भोगल्यावांचून ही गत्यंतर नाहीं. मनुष्यानें आपल्याकडून पाहिजे तो यत्न केला, तरीं भाललिखित सदोदित कंबरबांधून तयार असतें. ज्या सर्वशक्तिमान् परमेश्वरानें आपणास राजा बनविलें, तोच परमेश्वर मला राजकन्येची पदवी देणारा आहे.

परमेश्वराच्या अपारशक्ती कडून मनुष्यास जो अधिकार नेमिला गेला, त्यावर दुसऱ्याची सत्ता बिलकूल चालावयाची नाहीं. आपण माझे तीर्थरूप व कल्याणकर्ते असलां, तरीं प्रारब्धापुढें आपण काय करणार आहां? माझ्या प्रारब्धीं दुःखच असलें, तर आपल्या अपार सौख्यांतून लेशमात्र तरी मला मिळेल काय? वैद्याचीं मुलें मरत नाहींत काय? मग तेथें त्यांचा कांबरें उपाय चालत नाहीं? तात्पर्य, ज्याचें प्रारब्ध त्याचें सोबती आहे, दुसरा कोणीही त्याच्या विरुद्ध करण्यास समर्थ नाहीं." कन्येचें हें भाषण ऐकून राजास विलक्षण क्रोध आला, त्याचे बाहू, नेत्र, ओष्ठ आणि केश हे स्फुरूं लागले, सर्वांग लाल इंगळाप्रमाणें होऊन गेलें शेवटीं तिच्या जवळ जाऊन ह्मणाला; "दांडगे पोरी, लहाना तोंडीं मोठा घास घेण्याचा परिणाम चांगला होत नसतो, हें तुला अद्यापि ठाऊक नाहीं वाटतें? बरें असो तुझ्या प्रारब्धांत काय लिहिलें आहे व माझ्या शक्तीस तुझें प्रारब्ध कसें आड येतें, हें आतांच पहातों. तुझ्या या अन्यायास मोठीच शिक्षा पाहिजे होती; परंतु पोटची कन्या आहेस ह्मणून अगदींच निष्ठुरता करवत नाहीं, तथापि तुझें प्रारब्ध तपासल्यावांचून क्षणभर ही राहाणार नाहीं" कन्येबराबर इतकें भाषण झाल्यावर राजानें चाकरांस हुकूम केला कीं; "इच्या अंगावरचीं वस्त्रें भूषणें सर्व काढून घेऊन जेथें मनुष्याचें दर्शन ही होणार नाहीं व भयंकर पशु पक्षी रात्रंदिवस रहातात, अशा घोर अरण्यांत नेऊन

सोडा." बादशाहाचा हा हुकूम होतांच राजकन्येस नेण्यासाठीं चाकरांनीं मेणा आणिला, इतक्यांत हें वर्तमान राणीला समजून ती कन्येविषयीं प्रार्थना करण्यास कचेरींत आली, आणि हात जोडून मोठ्या दीन स्वरानें ह्मणाली. "महाराज, हें आपण काय करतां ? अज्ञान मुलांच्या भाषणांचा राग कोणी तरी मानितो काय? मुलांनीं सहस्त्रावधि अपराध केले, तरी मातरांनीं क्षमाच केली पाहिजे. असा अविचार करून पोटच्या लहान पोरीला अशी भयंकर शिक्षा केल्यानें लोक तरी आपल्याला काय ह्मणतील बरें ?" इत्यादि पुष्कळ प्रकारांनीं राजाचें मन फिरविण्याचा तिणें यत्न केला ; परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं व राजाज्ञेप्रमाणें मध्य रात्रीच्या सुमारास सर्व वस्त्रालंकार काढून घेऊन राजकन्येस चाकरांनीं अरण्यांत नेऊन सोडिलें. अहाहा ! काय त्या प्रसंगाचें वर्णन करावें ? ज्या सुकुमारेला आंगणही ठाऊक नाहीं, ऊन किंवा काळोख यांचा देखावा स्वप्नांत ही जिणें पाहिला नाहीं, स्वत: आपल्या हातानें नाकांतील नथही जिणें उचलली नाहीं, त्या सुंदरीवर असा प्रसंग गुदरल्यावर तिची काय अवस्था होईल हें तुमच्या अंत:करणांत येण्यास फार सुलभ आहे. महाराज, इतकें झालें तरी आमच्या बादशाहाजादीनें धैर्य सोडिलें नाहीं ; संकट कालचा मित्र, आप्त गण, गोत्र कायतें धैर्य, तेंच तिणें धारण केलें व त्याच्याच सहायानें पुढें सर्व गोष्टी घडल्या आहेत. चाकर निघून

गेल्यावर कांहीं वेळ पर्यंत इणें विलाप करून शेवटीं आपल्या खरोखर स्थितीविषयीं जेव्हां तिची खात्री झाली, तेव्हां सर्व दुःखें एकीकडे ठेऊन तिणें विश्वंभर ईश्वराचा धांवा आरंभिला. "परमेश्वरा, तूं धन्य आहेस ! तूं जें इच्छितोस, तें करूं शकतोस, इच्छिलेंस तें केलेंस आणि जें इच्छिशील, तें निःसंशय करशील. अहाहा ! कृपा सागरा, तुझी कृति फार स्तुत्य आहे. जगदीश्वरा, जेथपर्यंत तुझी कृपा आहे, तेथपर्यंत हर प्रयत्नांनीं तूं माझें संरक्षण करशील अशी मी पूर्ण खात्री बाळगित्यें. आणि या भरंवशावरच मी या स्थितीस आलें आहे. आतां तुला जें कर्तव्य असेल तें कर. पण विश्वंभरणा, तुझ्याशीं आणखीं एकदा थोडेंसें बोललें पाहिजे. अरे तुझी भक्ति किंवा सेवा करणें ह्मणजे मनुष्यांच्या ताबेदारी प्रमाणें नव्हे. तिजमध्यें काहीं अगाध गुण आहे असें आजपर्यंत अनंत विचारी मानीत आले, परमेश्वरा तुझ्या सेवेचा मुख्य प्रकार जो अंतःकरणार्पण, तें करण्याविषयीं मी तिलमात्र आळस केला नाहीं. आतां तुझ्या इच्छेची कमान पाहिजे तशी वाकूं दे. चंद्रसूर्यासारखे सत्यवादी साक्षीदार माझी हकीगत सांगून जगास उदाहरण दाखविण्यास आपल्या संपूर्ण कलांनीं तयार झाले आहेत. परमेश्वरा, उत्पन्न झालेल्या प्राणिमात्रांचा संरक्षण करणारा असें तुझें विरुद असतां मी आपल्याबद्दल तुला वेगळी विनंति ती काय करावी ?" याप्रमाणें ईश्वर स्तवन करीत असतां राजकन्येला निद्रा लागली. प्रातःकाल झाल्यावर एकाएकीं जागी

झाली आणि नित्य नियमाप्रमाणें तोंड धुण्याचें पाणी तयार नाहींसें पाहून मोठ्या क्रोधानें दासीस हाक मारीत आहे, इतक्यांत त्या अरण्य महालावर तिची दृष्टि जाऊन रात्रीच्या व्यवस्थेचें तिला स्मरण झालें, तेव्हां ती विस्मयानें आपल्यालाच ह्मणते. 'अगे हे हतभाग्य मुली, तू कोठें आहेस व कोणास हुकूम करयेस याचा विचार केलास? यापुढें तुझे चाकर, आप्त, मित्र काय जे हे मोठमोठे वृक्ष व पशु पक्षि होत. हेच आतां तुझी चाकरी करणार आहेत. तुझा बाप जो त्रैलोक्यनाथ परमेश्वर, त्याणें तुजसाठीं येथें कधीं न दमणारे असे चाकर (वृक्ष, तळीं इत्यादि.) ठेविले आहेत, त्यांस हुकूम कर. व तेच तुझ्या हुकमास मान देतील.' याप्रमाणें अंतःकरणाचें समाधान करून पाण्याचा शोध करण्यासाठीं निघाली; परंतु अनभ्यासी वगैरे माहित नसल्यामुळें तिला पाण्याचा शोधच लागेना. शेवटीं निराश झाल्यावर पुनः ईश्वराची स्तुति करूं लागली.

## कवित.

**जब दांतनये तब दूधदियो, जब दांतदिये कहाअन्न नदेहे जो जलमे थलमे पंछी पसूकी, सूधलेत सा तेरीभीलेहे ॥ काहको सोचकरे मनमुरख, सोचकरे कुछहाथनऐहे ॥ जानकोदेत अजानकोदेत, जहांकोदेत सोतोकोभी देहे ॥ १ ॥**

**अर्थ.**—जेव्हां दांत नव्हते तेव्हां ज्याणें दुध दिलें,

आणि आतां दांत दिल्यावर तो अन्न देणार नाहीं काय ? अंतरिक्षांत फिरणाऱ्या पक्ष्यांची व भूमीवर चालणाऱ्या पशुंची जो काळजी घेतो, तोच तुझी काळजी घेईल. व्यर्थ कां तूं दुःखी होयेस ? दुःख करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण जो मुर्खास, शहाण्यास, लहानास, मोठ्यास, दुष्टास, साधूस व सर्व त्रिभुवनास पोषितो, तोच तुझें पोषण करण्यास समर्थ आहे.'

महाराज, हें अगदीं सत्य आहे कीं, मनुष्यावर संकट आल्यावांचून त्यास ईश्वराचें स्मरण होत नसतें. जोंपर्यंत सुखांत दिवस जात असतात, तोंपर्यंत तें आपल्याच कर्तबदारीच्या व शहाणपणाच्या घमेंडींत असतें. याप्रमाणें अन्नपाण्यावांचून तीन दिवस गुदरले ; यावेळीं त्या सुकुमारीची काय अवस्था झाली असेल, याचा विचार आपणच करावा. तिच्या सुकुमार व मृदु अंगाला काठिण्य आलें ; सोनचाफ्याच्या फुलाप्रमाणें गौर देहावर पांढरेपणाची झांक दिसूं लागली ; कमलासारखें मुख अगदीं निस्तेज झालें ; गुलाबाप्रमाणें दिसणारे गल्लगुच्छ अगदीं कोमेजून गेले ; इतकी दशा झाली तरी अगदीं आसन्न मृत्यु झालेल्या मनुष्यासही आपण आणखी वांचावें व ऐहिक कार्ये करावीं अशी आशा असते, हा सर्व साधारण नियम आपल्यास माहितच आहे, त्याचप्रमाणें इलाही पुढील आशेनें व्याप्त केलें. चौथ्या दिवशीं प्रातःकाळीं एक तेजस्वी मुद्रेचा व आनंदी मनाचा अरण्यवासी तापसी तेथें आला आणि ह्मणाला ; "राजकन्ये,

तुझा पिता सार्वभौम राजा असतां तूं अशा दुःखांत कां बरें पडलीस? असो, व्हावयाचें तें चुकत नाहीं; परंतु आजपासून तूं मला आपला सेवक असें समजून मजजवळ रहा. ईश्वर सत्याचा स्वामी आहे, तो कधीं ही उपेक्षा करावयाचा नाहीं, हें मर्म अहोरात्र ध्यनांत ठेव." ज्या प्राण्यास तीन अहोरात्रींत मनुष्याच्या शद्बाचा प्रतिध्वनी हीं ऐकूं आला नव्हता, त्याला अशी अश्वासनोक्ति ऐकूं आल्याबराबर किती बरें आनंद होईल? असो त्या तापस्यानें राजकन्येचें याप्रमाणें समाधान करून आपल्या झोळींत जें कांहीं शिळें पाकें अन्न होतें, तें राजकन्येपुढें ठेविलें, व आपण पाण्याच्या शोधार्थ निघाला. अरण्यांत फिरतां फिरतां एक विहीर त्याच्या दृष्टीस पडली; परंतु पाणी काढण्यास दोर व भांडें नसल्यामुळें मोठया विचारांत पडला. शेवटीं त्यानें झाडाचीं मोठमोठीं पानें तोडून त्याचा एक मोठा द्रोण केला व तो वस्त्रानें विहिरींत सोडून त्यांत जितकें पाणी आलें, तेवढें राजकन्येस आणून दिलें. थोडेंच पण जीवनप्रद अन्नोदकानें राजकन्येस थोडा तवका आला व तिला आपण खचित जगामध्यें आहों व राहूं अशि खात्री वाटूं लागली. पुर्व झालेल्या सर्व दुःखाचें स्मरण होऊन तिणें त्या तपस्व्याचे पराकाष्ठेचे उपकार मानिले. उभयतांचीं क्षेमकुशलें झाल्यानंतर तपस्व्याच्या आज्ञेप्रमाणें त्याजपाशीं रहाण्यास राजकन्या कबूल झाली. त्यानें राजकन्येविषयीं इतकी काळजी घ्यावी कीं; ती आप-

त्या बापाच्या घरीं असतां तिच्या शेकडों दासी किंवा प्रत्यक्ष आई बापांनीं ही इतकी घेतली नसेल. उभयतांच्या या अप्रतीम प्रीतिमुळें दोघांस ही वि- लक्षण सुख वाटूं लागलें. तापस्यानें प्रातःकालीं शहरांत जाऊन भिक्षा मागून आणावी व उभयतांनीं तिजवर निर्वाह करावा, याप्रमाणें क्रम चालूं लागला. राजकन्या व तापसी हीं उभयतां परस्परांवर सारखी प्रीति ठेवित, यामुळें दोघांस ही अत्यानंद वाटे.

एके दिवसीं राजकन्या आपले केश विंचरीत अस- तां प्रारब्ध वशतेनें केशांतून एक मोतीं तिच्या पुढें पडलें. तें पाहातांच तिला मोठा आनंद झाला. तिणें तें मोतीं, लागलेंच त्या तापस्याच्या स्वाधीन केलें, आणि विकून द्रव्य आणावयास सांगितलें. त्यानें याप्रमाणें करून त्याचें जें द्रव्य आलें तें राजकन्येच्या स्वाधीन केलें. पुढें एके दिवसीं राजकन्येच्या मनांत एक लहा- नशी झोपडी बांधण्याची इच्छा उद्भवली व तिणें ती लागलीच त्या तापस्यास कळविली. तापस्यानें सांगितलें, बेटा, आपल्यास येथें काय करावयाचें आहे? तरीं तुझी इच्छा असेल तर भिंतीसाठीं तूं पाया खण आणि मी पाणी आणून माती तयार करितों. असें सांगून त्याणें जवळ फिरून कांहीं लांकडें जमा केलीं व पाणी आणावयास गेला. इकडे राजकन्या ही पाया खणूं लागली. प्रारब्धाची गति मोठी अतर्क्य आहे, असें मोठ मोठे विद्वान ह्मणतात तें अगदीं खरें आहे, हे राजकुमारा, आमच्या या यजमानणीच्या प्रस्तु-

तच्या ऐश्वर्यास झोपडीच्या संकल्पानें खणलेलाच कारण झाला. ती पाया खणित असतां तिला एक कडी आढळली, ही कशाची ह्मणून शोध करण्या करितां राजकन्येनें ती अगदीं खुली करून पाहिली तों ती एका दारास लाविलेली असून त्याला एक भक्कम कुलूप आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. "ईश्वर सत्याचा कैवारी" या तापस्याच्या वाक्याची तिला आठवण होऊन तिणें ईश्वराचें स्तोत्र करून तें कुलूप फोडिलें, व दार उघडून पाहिलें तों आंत सुवर्ण, मोतीं, रत्न व माणिक यांचा सारखा ढीग पडलेला तिच्या दृष्टीस पडला. यावेळीं राजकन्येस कोणत्या प्रकारचा आनंद झाला असेल, याचा विचार आपल्या मनांत आला असेलच, तेव्हां मी अधिक काय सांगूं? असो, राजकन्येनें त्यांतील कांहीं सोन्याचे गट काढून घेऊन पुनः जसेंच्यातसेंच द्वार बंद केलें, व त्यावर पूर्व माती घालून साफ करून ठेविलें. इतक्यांत तो वृद्ध अरण्यवासीही पाणी घेऊन आला. त्यास राजकन्येनें सर्व हकीगत न सांगतां ह्मणाली, "बाबा आज परमेश्वरानें आपल्यावर खरोखर कृपा केली, तर आपण शहरांत जाऊन चांगले चांगले सुतार, गौंडी, पाथरवट, वगैरे कारागीर घेऊन या ह्मणजे आपण एक सुंदर वाडा बांधू. हा वाडा इतका सुंदर व टुमदार करावयाचा कीं; याला साऱ्या जगांतही प्रतिमा सांपडू नये. तसाच एक उत्तम बागही तयार करूं. प्रारंभीं चांगल्या कारागिरापासूनें वाडा बाग, जलमंदीर, पागा व मुसाफरखाना याचा नकाश

राजकन्येच्या हुकमाप्रमाणें तो वृध्द तापस लागलाच शहरांत गेला व उत्तम कारागेराकडून इमारतीचे कित्येक उत्तम नकाशे काढवून ते व कित्येक उत्तम कारागीर, यांसही बराबर घेऊन आला. राजकन्येनें सर्व नकाशे पाहिल्या नंतर त्यांपैकीं कांहीं पसंत करून त्यांप्रमाणें मंदिरें बांधण्यास परवानगी दिली. राजकन्येचा हुकूम होतांच मोठया झपाट्यानें काम चालू झालें. पाथरट लोकांच्या टाकीचे आवाज, आर्केस लोकांचे कर्वत, सुतार लोकांच्या तासण्या, हमाल लोकांचे श्रम निवारणार्थ गायन, इत्यादिकें करून तो सर्व भाग नादाऊन गेला होता. सहस्त्रावधि लोक अरण्यांत कामास जातात व लक्षावधि रुपयांचें नित्यशः नवीन सामान खरेदी होतें, ही वार्ता कांहीं दिवसानीं राजाच्या कानावर गेली. ही गोष्ट ऐकून राजास जितकें आश्चर्य वाटलें, तसें त्याला पूर्वीं कधींही वाटलें नसेल. तो प्रत्येकास विचारी कीं; "ही गोष्ट खरी आहे काय? बरें अशीं मंदिरें बांधणारा आपल्या नगरांतीलच आहे काय? आणि तो नगर उपवनें सोडून, शिकारीसही जाववत नाहीं, अशा घोर अरण्यांत मंदिरें तयार करीत आहे, याचें कारण काय असावें बरें?" याविषयीं कोणासही माहिती नसल्यामुळें राजाच्या शंकांचें समाधान कोणाच्याच हातून झालें नाहीं. शेवटीं राजानें हें काम आपल्या एका उमरावाकडे सोपवून त्यास असें सांगितलें कीं; "तुह्मीं तेथें जाऊन या गोष्टीचा शोध लावावा व इमारतीचा मालक कोण याची चौकशी

करून त्यास माझा निरोप सांगावा कीं; मला आपलीं मंदिरें पहाण्याची फार इच्छा आहे." राजाच्या आज्ञे-प्रमाणें उमरावानें तावडतोब त्या अरण्यांत जाऊन पाहिलें तों राजानें सांगितल्यापेक्षांही अधिक कारखा-ना त्याच्या दृष्टीस पडला, नंतर त्याणें राजकन्येचा शोध करून राजाचा निरोप तिला कळविला. तो ऐकून राजकन्येस मोठें समाधान वाटलें व तिणें हें खालीं लिहिलेलें पत्र त्याजकडे पाठविलें.—"सर्वोपमा-युक्त सार्वभौम राजाधिराज, आपली स्तुति मी गरीब स्त्रीनें काय करावी? आपण कृपाकरून माझी झोपडी पावन करणार हें ऐकून मला मोठा आनंद झाला आहे. आपली पायधूळ माझ्या सारख्याच्या घराला लागणें हें खरोखरच आश्चर्य आहे. आपल्या सारख्या-चें आगमन होणें हें त्या प्रांताचे, घराचे आणि विशे-षेंकरून त्यांत वास करणाराचें विलक्षण भाग्य समजलें पाहिजे, अशा उत्तम लाभाची संधी मला प्राप्त झाली यापेक्षां परमेश्वरानें मजवर कृपा ती कोणती करावी? असो ईश्वर आपलें सदोदित कल्याण करो. या दासी-च्या गृहीं येऊन गरीबाच्या मीठ भाकरीचा स्वीकार होईल तो सुदिन! अधिक काय लिहूं क्षमा असावी ही विज्ञापना."

राजानें हें पत्र पहातांच व उमरावानें सांगितलेली हकीगत ऐकतांच त्यास विलक्षण आनंद झाला. इतक्य सुशिक्षित व संपन्न स्त्रीस न भेटणें ह्मणजे मूर्खपणाचा कळस असा सिद्धांत करून त्याणें तत्काल राजकन्

कडे एका उमरावाबरोबर निरोप पाठविला कीं; आपलें आमंत्रण मला शिरसामान्य आहे. आह्मी आज रात्रीं खचित येतों." हा निरोप राजकन्येस कळवीतांच तिणें मोठ्या आदरानें त्याची रवानगी केली व नौकर लोकांस सक्त हुकूम फर्माविला कीं; 'आज रात्रीं शहरच्या राजास मेजवानी करावयाची आहे, यासाठीं अवश्य तितक्या पदार्थांची आतांच्या आतां व्यवस्था करावी.' नोकरांस हुकूम होतांच त्याणीं तत्काल मंडप तयार केला, नानाप्रकारच्या किनखापांनीं त्याचे खांब मढविले, अमूल्य शालनाम्याचीं छतें दिलीं, नानाप्रकारचें रोशनाईचें सामान त्यांत लाविलें, सभोंवार हवा येण्यासाठीं मश्रूच्या कनाथीस सुंदर कमानीदार खिडक्या तयार करून त्याला सुंदर झालरी लाविल्या. बाहेरच्या बाजूस सामान्य लोकांकरितां सामान्य मंडप देऊन बिच्छाईत केली. मोठ्या मंडपांतील संपूर्ण बिच्छाईत परें भरून केलेल्या मखमलींच्या गाद्यांची होती व त्यांना सुंदर किनखापी गोठ लावले होते, कनाथीस उत्तम प्रकारच्या बिलोरामध्यें बसवलेल्या बाग, रानें शहरें, समारंभ, लढाई वगैरे अनेक देखाव्यांचीं हुबेहुब रंगानें तयार केलेलीं अनेक चित्रांच्या तसबिरा लटकविल्या होत्या. मंडपापासून थोड्याच अंतरावर चौफेर नगारखान्याचे मंडप तयार करवून अति चतुर असे बाजंत्री आणविले होते; पदरच्या सर्व लोकांस नवीन वस्त्रालंकारांनीं भूषित केलें होते. दासी तर अशा सजविल्या होत्या कीं; त्यांचे सर्व शरीर एकएका प्रकारच्या रत्नांनीं

मढवूनच काढलें आहे काय असा भास होई. ज्यांनीं पाचाचीं भूषणें घातलीं होतीं, त्यांच्या वेणीच्या गजऱ्यापासून तों वस्त्रापर्यंत सारखा हिरवा पोषाख होता, याचप्रमाणें, हिरे, माणिक, सोनें, नीळ वगैरे तसतसे पोषाख दिले होते. अशा थाटानें तयार केलेल्या दासींचे पोषाखांच्या रंगाप्रमाणें वेगळाल्या पंक्ती उभ्या केल्या होत्या. स्वतः आपण अगदीं साधा पोषाख करून बसली होती; मेजवानीसाठीं नानाप्रकारचीं पक्वान्नें, मांसें, मद्यें, फळें, रस इत्यादि पदार्थ उत्तम स्वयंपाक्याकडून असे तयार करविले होते कीं; त्यांचें वर्णन ऐकिल्यानेंच क्षुधा शांत व्हावी असो, याप्रकारची सर्व तयारी करून राजकन्या राजाची मार्गप्रतीक्षा करीत आहे, तों राज्याच्या स्वारीची नौबत सुरू झाली. त्याबरोबर ही आपल्या ऐश्वर्यानिशीं कांहीं पावलांवर राजास सामोरी गेली. मोठ्या आदरानें व मर्यादेनें एकमेकांच्या भेटी झाल्या नंतर राजासहवर्तमान राजकन्या नियमित मंडपांत येऊन पोंचली. आतिथ्याचा समारंभ पाहून राजास मोठें आश्चर्य, आनंद व लज्जा हीं उत्पन्न झालीं. आपली संपत्ती यापुढें कांहींच नाहीं असा त्याच्या मनानें निर्धार केला. असो मंडपांत गेल्यावर राजाकरितांच मुद्दाम एक रत्नजडित सिंहासन तयार केलें होतें, त्यावर त्यास बसविलें. प्रधान, मुत्सुद्दी, मानकरी वगैरे लोकांस योग्यतेप्रमाणें उजव्या डाव्या बाजूस व मागें बसविलें. कचेरीचा सर्व थाट जमल्यानंतर नृत्यास प्रारंभ झाला राजास नजर करण्यासाठीं राजकन्येनें

कित्येक मंचक, अलंकार, पोषाख, भांडीं, तसबिरा वगैरे वस्तु तयार केल्या होत्या, त्या सर्व कामगारांनीं सरपोसांनीं आच्छादुन मंडपांत आणून ठेविल्या. राजकन्येनें मोठ्या अदबीनें उभीराहून सांजवरील सरपोस काढले आणि त्यांचा स्वीकार करण्याविषयीं बादशाहास विनंती केली. नजर केलेल्या वस्तु पहातां-क्षणीं त्यांच्या अपार तेजानें सर्वांचे नेत्र एकदम दिपून प्रत्येक मनुष्य आपापल्या मनांत शाहाजादीच्या संपत्ती-विषयीं अचंबा करूं लागला. असो राजास हा नजराणा अर्पण करून आणखीं दोन शुभ्र हत्ती, जडावाच्या अंबारी सहित द्वाराबाहेर उभे केले होते, त्यांचा ही स्वीकार करण्याची तिणें राजास विनंती केली. बादशाहानें सर्व नजराण्यांचा स्वीकार करून मोठ्या प्रेमानें तिच्या ऐश्वर्याची, नम्रतेची, व्यवस्थेची व सद्गुणांची स्तुति केली व तिला खालीं बसण्याविषयीं आग्रहपुरःसर सांगितलें. ही कोण, हें समजण्याची बादशाहास पूर्वींपासूनच इच्छा होती, ती पूर्ण करण्यासाठीं त्याणें राजकन्येस प्रश्न केला. व आणखी ह्मणाला कीं कृपाकरून आपण एवढी देणगी मला दिलीच पाहिजे.

राजकन्येनें राजाचा प्रश्न श्रवण करतांच मोठ्या मर्यादेनें पुढें उभी राहिली व दोन्ही हात जोडून नम्र व कोमल शब्दांनीं बोलूं लागली. " महाराज, आपण ओळखिलें नाहीं काय ? ज्या अज्ञान कन्येवर रागावून आपण जिला भयंकर अरण्यांत सोडून दिलें

होतें, तीच ही प्रस्तुत तुह्मांपुढें उभी असलेली परमे श्वराची दासी होय, व हें सर्व ऐश्वर्य हें ईश्वराच्या दयालुपणाचें व दीनरक्षक पणाचें साक्षीदार आहे." कन्येच्या तोंडांतील मर्मभेदी अक्षरें ऐकतांच राजाची दशा काय झाली असेल हें उघड आहे. त्याच्या सर्व अंगास एकदम घाम सुटला, प्रेमाश्रूंची नेत्रास सारखी धार लागली, कंठ सद्गदित झाला; तथापि सर्व विकारांचें सहन करून त्याणें मोठ्या लगबगीनें उठून कन्येस पोटाशीं धरलें, आणि मोठ्या स्वरानें ह्मणाला, "बेटा तुझी दुर्दशा करण्यांत या चांडाळानें कांहींच न्यूनता केली नाहीं; परंतु परमेश्वरानेंच तुझें वचन पार पाडलें बये खरोखरच आज कुलाचा उद्धार झाला. असो, या दुष्टापासून घडलेले सर्व अपराध विसरून एकवार या पापराशीला बाबा ह्मणून हाक मार." बापाचें हें भाषण राजकन्येस पराकाष्ठेचें वाईट वाटलें. ती ह्मणाली;-"माझ्या प्रियकर बाबा, यांत आपल्याकडे कांही एक दोष नाहीं. हा केवल माझ्या प्रारब्धाचाच संस्कार असा होता, ह्याविरुद्ध वागणें आपल्या हातून कसें होईल बरें? असो, मनुष्याच्या स्वाधीन कांहीं नाहीं, परमेश्वर ठेवील त्याच स्थितींत त्याणें राहिलें पाहिजे एवढी गोष्ट या माझ्या उदाहरणापासून निर्विवाद सिद्ध होत्ये." राजकन्येच्या या पोक्त भाषणानें राजाचें अंतःकरण अधिक सद्गद झालें, त्याणें तिला लागलीच आपल्या शेजारीं बसवून नानाप्रकारें करून आपली, ऐश्वर्याची व प्रारब्धाची पुनः पुनः

निंदा केली व एका सेवकाबरोबर आपल्या राणीस मुलींसहवर्तमान त्वरित आणण्याविषयीं हुकूम केला. राजाच्या हुकमाप्रमाणें सेवकानें जाऊन सांगतांच साहा कन्या सहवर्तमान मोठ्या थाटानें राणी साहेबांची स्वारी दाखल झाली. तिला पूर्वीचें वर्तमान कांहींच माहित नसल्यामुळें राजीप्रमाणें तिच्याही अंतःकरणास विलक्षण भ्रम पडला. आपार ऐश्वर्याचा थाट पाहून तिला वाटलें कीं; कोणा एकाद्या मोठ्या राजाच्या भेटीसाठीं महाराजांनीं हा समारंभ केला असेल. असो, राणीची स्वारी मंडपांत दाखल होतांच मोठ्या आनंदानें राजकन्येनें तिला आलिंगन दिलें.. राणीनें आपल्या कन्येस ओळखितांच तिला जो दुःखाचा उमाळा आला, त्याबरोबर ती धाय धाय रडूं लागली. राजकन्येच्या सहा बहिणीसही पराकाष्ठेचें वाईट वाटलें. राजकन्येनें सर्वांचे समाधान करून नानाप्रकारचे अलंकार वस्त्रें त्यांस नजर केलीं. या दिवसीं जें ऐश्वर्य प्रकट झालें होतें, तसें कुबरानेंही पाहिलें नव्हतें असेंही ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

जेथपर्यंत बादशहा जिवंत होता, तेथपर्यंत तो केव्हां केव्हां कन्येच्या मंदिरांत येत असे व राजकन्या ही शहरांत जात असे, असा कित्येक दिवस क्रम चालला असतां बादशाहा परलोकवासी झाला. त्याच्या पोटीं पुत्र नव्हता, तरीं त्याणें आपल्या सात कन्यांतून याच शहाजादीला वारस ठरविलें होतें; त्याणें बादशाचें देहावसान होतांच संपूर्ण राज्याधिकार आमच्या या शहा-

नादीस प्राप्त झाला. महाराज, आमच्या शाहजादीच्या ऐश्वर्याची वगैरे सर्व हकीगत आपण ऐकिलीच; त्याव-रून ईश्वराच्या अतुल दातृत्वाचा विचार आपल्या मनांत आलाच असेल. परमेश्वराची देणगी, स्वीका-रणाऱ्याचे मनोरथ शुद्ध व सत्य असले ह्मणजे मिळा-ल्यावांचून रहावयाचीच नाहीं याकरितां ईश्वराच्या देणगीबद्दल आपण मनुष्यांनीं आश्चर्य करणें सर्वथैव अप्रशस्त आहे."

या प्रमाणें राजकन्येचा वृतांत सांगून किंचित वेळ गेल्यानंतर तीच दासी पुनः मला ह्मणाली .— " कां महाराज, **निमरॉज** शहरास जाऊन पूर्वीं सांगितल्या गोष्टीचा शोध लावून येतां किंवा कसें ? आणि जर जाणेंच आहे; तर मग विलंब तरीं कां करितां ? " दासीचें हें भाषण ऐकून मी ह्मटलें; " मी जाणार यांत व सांगितलेल्या गोष्टीचा शोध करून परत येईन यांत कांडी इतका ही संशय नाहीं. आतां फक्त राज-कन्येच्या परवानगीचाच विलंब आहे. माझ्या तोंडांतील हीं अक्षरें ऐकतांच कोकिलाच्या शब्दास ही लाजवि-णाऱ्या अशा मधुर स्वरानें राजकन्येनें पडद्यांतून सांगि-तलें. " महाराज, आपल्यासारख्या सद्गुणी व थोर पुरुषांस अशा कामाकरितां श्रम देण्या विषयीं मला फार वाईट वाटतें; परंतु निरुपायानें सांगणें मला भाग आहे, परमेश्वर आपल्यास यशस्वी करून चिरायु करो व मा-झ्या अंतःकरणांत आपल्यास याहून उत्पन्न झालेला मनोरथ वृक्ष पक्व दशेस येऊन सफल होवो. " मित्रहो

प्रस्तुत जरी मी फकीर बनलों आहे, तरीं त्या अक्षराचें, त्या मधुर स्वराचें, त्या मर्यादेचें स्मरण झालें ह्मणजे जें दुःख होत आहे, तेंच माझ्या सर्व हालाचें मूळ आहे. असो, राजकन्येची परवानगी मिळाल्या नंतर परमेश्वराचें स्तवन करीत, व पुढील मोठया लाभाची इच्छा करीत मोठया प्रयासानें मी त्या शहरांतून निघालों.

दरकुच दरमजल करितां करितां सुमारे एक वर्षानें मी **निमराज** शहरास सुखरूप पोंहचलों. शहरांत पातों तों पूर्वी ऐकिल्याप्रमाणें एकंदर आबालवृद्ध व गरीब श्रीमान लोकांनीं काळा पोषाख केला आहे असें माझ्या दृष्टीस पडलें. कांहीं दिवसांनीं शुद्ध प्रतिपदा आली, त्यावेळीं पूर्वी ऐकिल्याप्रमाणें एकंदर नगरवासी लोक शहरा बाहेर एका मोठया मैदानांत जमले. मी ही तेथें गेलों होतों; परंतु माझा पोषाख, रीती वगैरे सर्व भिन्न आणि गैर माहीतगार असल्यामुळें फक्त तो चमत्कार व त्यापासून होणारा परिणाम पहाण्याकरितां एकीकडे प्रवासी लोकांत जाऊन उभा राहिलों. कांहीं वेळ गेल्यावर एक सुंदर व तरूण पुरुष एका तांबड्या बैलावर बसून मोठयानें ओरडत तेथें येऊन दाखल झाला. तो इतका दमला होता कीं; त्याच्या तोंडास फेंसाचा गोंडा देखील आला होता. मी ज्या गोष्टीच्या शोधास आलों व इतकीं दुःखें सोसलीं, ती गोष्ट हीच अशी जरी माझी खात्री होती, व शोधाकरितां धैर्य करावें असा जरीं माझ्या मनानें निश्चय केला होता;

तरी भीतीनें आपल्या तीक्ष्ण शस्त्रानें धैर्याचा पराभव केला व मी कांहींच विचार करण्यास समर्थ नाहीं अशी माझी स्थिति होऊन गेली. इकडे त्या तरूण मनुष्यानें खोजाच्या तोंडून ऐकिल्याप्रमाणें कृती केली व पुनः बैलावर बसून चालता झाला. तो पाठमोरा होतांच लोकही घरोघर जाण्यास निघाले, त्यावेळीं मला आपल्या कामाचें स्मरण होऊन मनाला पुष्कळ रागें भरलों; परंतु उपाय काय? शेवटीं मोठ्या दुःखानें मी त्या लोकांबराबर परत शहरांत आलों. पुढें शुद्ध प्रतिपदा केव्हां यईल यावांचून मला दुसरा ध्यासच नाहींसा झाला. वेळोवेळ पंचांग घेऊन क्षय तिथी तरीं आहे कां ह्मणून पहावें, हा सबंध महिना मला इतका दुःखांत गेला कीं; असें दुःख मी यावज्जन्मांत अनुभविलें नव्हतें. असो नखांबोटांनीं दिवस मोजित असतां प्रारब्धोदयानें एकदाची शुद्ध प्रतिपदा आली; तो दिवस मात्र मला मोठा आनंदाचा असें वाटलें. त्यादिवशीं पूर्वीं प्रमाणेंच पोषाख करून सर्व लोक त्या मैदानांत जमले व त्यांच्या बरोबर मीही तेथें जाऊन पोहचलों. व अंतःकरणाचा दृढ निश्चय केला कीं; कांहीं झालें तरीं आज या गोष्टीचा पुरता निकाल केल्यावांचून रहावयाचें नाहीं.

यानंतर कांहीं वेळानें तो तरूण मनुष्य एका हातांत नागवी तलवार व एका हातांत बैलाची वेसण धरून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें कृतीनें तेथें येऊन दाखल झाला. तो बैलावरून खालीं उतरतांच त्याजबरोबर जो एक सेवक होता,

त्याच्या हातीं त्याणें एक चंबू दिला व सेवकानें क्रमानेंच तो सर्व मनुष्यांस दाखविला. ज्याज्या मनुष्यापुढें चंबू घेऊन चाकर जाई, तो तो मनुष्य तो चंबू पाहून धाय धाय मोकलून रडे. याप्रमाणें सर्व लोकांस चंबू दाखविला नंतर त्या तरूण मनुष्यानें तो चंबू आपटून फोडून टाकला व हातांतील तरवारीनें जवळच्या सेवकाचें एका वारासरसें डोकें उडविलें आणि आपण पुन: बैलावर बसून चालता झाला. त्याच्या मागून जाऊन या गोष्टीचा शोध करण्यासाठीं मी मोठ्या सपाट्यानें निघालों; परंतु शहरांतील लोकांनीं मला तत्काल प्रतिबंध करून धरिलें; मी त्यांची पुष्कळ विनवणी केली; परंतु त्याणीं तिकडे लक्ष न देतां मला एकच सांगितलें कीं; “ आपण आपल्या प्राणास जर फारच कंटाळलां असाल, तर आपणास बिलकूल श्रम व दु:ख न होतां इच्छा पूर्ण होण्यास आणखीं पुष्कळ उपाय आहेत.” पुष्कळांपुढें माझें एकट्याचें काय चालतें ? तरीं शेवटीं त्यांच्या हातून सुटून जाण्यासाठीं ओढाताण करण्यासही मी आळस केला नाहीं; परंतु पांच सहा ज्वानांनीं मला धरिल्यामुळें मला त्याही वेळीं निराश परत येऊन पुढें एक महिनाभर दिवसांचें गाणित करीत बसण्याचें भाग आलें. जसा तसा महिना संपल्यावर प्रतिपदा आली व शिरस्त्याप्रमाणें सर्व लोक ज्या मैदानांत जमले. मागील अनुभवावरून समाजांत असून आपला हेतु सिद्ध होणार नाहीं असा सिद्धांत ठरवून सर्वांच्या पूर्वींच ज्या रस्त्यानें तो तरुण

मनुष्य जात व येत असे, त्या रस्त्यांतील एका झाडाच्या आड लपून उभा राहिलों. कांहीं वेळ गेल्यानंतर तो तरुण मनुष्य आला व पूर्वींच्या शिरस्त्याप्रमाणें कृती करून परत जाण्यास माघारा फिरला. तो परत जात आहे, असें माझ्या दृष्टीस पडतांच मीही त्याचा पाठलाग केला. माझ्या येण्याची चाऊल समजून त्याणें मागें पाहिलें व मला भिवविण्यासाठीं मोठ्यानें आरोळी मारिली, पण सर्व ब्रह्मांडांतील धैर्य मला आल्यामुळें मी त्याच्या आरोळीस कांहींच दाद दिली नाहीं. शेवटीं त्याणें मोठ्या त्वेषानें म्यानांतून तलवार उपसली व माझ्या मस्तकावर घालणार इतक्यांत मी त्यास मोठ्या नम्रतेनें व गंभीर मुद्रेनें प्रणाम केला. आणि कांहीं एक न बोलतां हात जोडून स्वस्थ उभा राहिलों. अहाहा ! न्यायी मनुष्य कधींही अन्याय करणार नाहीं. त्याणें ती माझी शरण मुद्रा पहातांच आपला हात आटपला व मला ह्मणाला; " अहारे, बापड्या प्रवाशा, आज विनाकारण मरण पावला असतास तुझ्या आयुष्याची दोरी बळकट ह्मणूनच तूं वांचलास. बरें असो आतां चालता हो" असें ह्मणून त्याणें आपल्या कमरेची, कित्येक पाचूंचे गुच्छ लटकले आहेत, व जिजमध्यें नानाप्रकारचीं रत्नें जडविलीं आहेत अशी एक सुंदर कट्यार मजकडे फेकून ह्मणाला; " बाबारे, तुला देण्यासारखें मजपाशीं कांहीं नाहीं, याकरितांच ही कट्यार राजास नेऊन दाखीव आणि तुला जी इच्छा असेल तो पदार्थ मागून घे. या खुणेवर तुला

सर्व मिळेल." इतकें सांगून तो तरुण पुरुष मोठ्याने ओरडत निघून गेला.

इतकें झालें तरीं माझें धैर्य कमी झालें नाहीं. मी अंत:करणांत पूर्ण निश्चय केला कीं; "हातीं घेतलेलें काम कोणत्याही अडचणीसाठीं अपूर्तें टाकावयाचें नाहीं; कारण असा समय पुन: येणें फार कठीण आहे." जीवावर उदार होऊन पुढें चाललों, तों त्याणें पुन: मार्गे वळून कानटाळे बसतील अशी एक भयंकर आरोळी मारिली, व मला पुढें येण्याविषयीं मनाई केली; तथापि मी हात जोडून त्यापुढें गेलों आणि ह्मणालों "हे शूर पुरुषा, एका घावाबरोबर दोन तुकडे होतील असा मानेवर वार कर आणि मला दु:सह दु:खांतून मोकळा होऊंदे. ...त्या हत्येपासून घडलेल्या पातकाची परमेश्वर तुला क्षमा करो." हें माझें भाषण ऐकतांच त्या सत्पुरुषाचें अंत:करण दयेनें कळवळून गेलें, व सद्गद कंठानें तो मला ह्मणाला; "चांडाळा, मुद्दाम मला कांबरें दोषांत घालितोस? आल्या रस्त्यानें माघारा जा हें फार चांगलें." इतकें झालें तरीं मी आपला निर्धार न सोडितां तसाच पुढें चाललों. सुमारें २ कोश चालल्यानंतर अरण्य संपून एक मोठें मैदान व त्यांत सुंदर व भव्य असा एक वाडा दृष्टीस पडला. त्या तरुणानें वाड्याच्या दरवाजापाशीं मोठ्यानीं आरोळी मारिल्याबरोबर खाडकन दरवाजा उघडला व तो आंत जातांच पुन: दरवाजा लागला गेला. मी

बाहेरच होतो. या ठिकाणीं मी एकटा असल्या कारणानें त्या तरुणाची पूर्वीची वर्तणूक वगैरे या गोष्टी मनांत आल्यानें मला अतिशय चिंता लागली. पुढें आपलें कसें होईल, काय करावें, याविषयीं कांहींच सुचेनासें झालें, नानाप्रकारें परमेश्वरास करुणा भाकूं लागलों; इतक्यांत एक जासूद मजपाशीं येऊन ह्मणाला; "बाबारे, काय तुझ्या प्रारब्धीं आहे तें समजत नाहीं, चल त्या तरुण पुरुषानें तुला बलाविलें आहे." मी ह्मणालों; "बाबारे, माझें प्रारब्ध फार चागलें आहे, त्याची तूं अगदीं काळजी करूं नको. बेलाशक मला घेऊन चल." नंतर त्याणें मला त्या तरुणाकडे नेलें. मी त्यास मोठ्या मर्यादेनें सलाम करून त्याच्या परवानगीनें खालीं बसलों. तो एका सुंदर जरीदार गादीवर बसला होता, जवळ कांहीं घडवंच्या मांडल्या होत्या व हातांत एक पाचूची स्मरणी होती. त्याची उठावयाची वेळ होतांच जवळचे सर्व लोक भडाभड वेगवेगळ्या ठिकाणीं जाऊन छपून राहिले. हें पाहून मीही भयभीत होऊन एका लहानशा कोठडींत जाऊन बसलों. या तरुणानें सर्व दारांस कड्या लावून आपण बागेकडे गेला व ज्या बैलावर तो नित्य स्वारी करीत असे, त्यास बडग्यानें मारूं लागला. बैलाच्या करुणस्वरानें मला इतकें दुःख झालें कीं; माझ्या सर्व [illegible]कदम बदलल्या. या गोष्टींतील हेतु समजण्याची तला द[illegible] [illegible] पूण इच्छा असल्यामुळें जरीं माझ्या दारास कडी होती, तरीं मोठ्या हिकमतीनें दार उघडून चोर पावलानीं जाऊन एका झाडा आड उभा राहून सर्व

चमत्कार पाहूं लागलों, इतक्यांत त्या तरुणानें हातां-
तील वडगा टाकून माझ्याकडे येऊं लागला. हें पहा-
तांच पुनः पूर्ववत मी आपल्या खोलींत छपून बसलों,
तों तरुण मनुष्य एका खोलीची कडीं काढून आंत
शिरला व लागलाच बाहेर येऊन त्याणें त्या बैलाचे
आंगावर हात फिरविला, पाठ थोपटली, मुके घेतले व
त्यास दाणावैरण वगैरे घालून पुनः माघार[illegible]ातिशे
त्याणे सर्व दारांच्या कड्या काढल्या. नं[illegible] गणित
सर्व नोकर बाहेर आले व त्याणीं एक ल्हान[illegible] पुत्र फार
हात धुण्याकरितां पाणी व हात पुसण्याकरितां [illegible]ंदर बाद
दर रुमाल, इतकें सामान आणून ठेविलें. त्या तरुण
मनुष्यानें तोंड व हात धुवून ईश्वराची प्रार्थना केली व
ह्मणाला, " अरे सेवका, तो प्रवासी कोठें आहे. [illegible]
इकडे बलाव. " हे शब्द ऐकतांच मी मोठ्या त्वरेनें
जाऊन त्याजपुढें समर्याद उभा राहिलों. त्याणें मजक-
डे पाहून मला खालीं बसावयास सांगितलें, मी बस-
ल्यानंतर त्याणें चाकरास भोजन आणण्याचा हुकूम
केला. चाकरानीं तत्क्षणींच सुंदर दोन सोन्याच्या
ताटांत नानाप्रकारचीं अन्नें भरून आणून ठेवि-
लीं, नंतर उभयतांनींही यथेच्छ भोजन केलें, व विडे
खाऊन त्या गालीचावर बसलों, तरुणानें आपल्या सर्व
सेवकांस एकीकडे जाण्यास सांगून मला ह्मटलें; " बा-
[illegible]रे, तूं असा जाणून बुजून आपले प्राण धोक्यांत
घालितोस, तेव्हां तुझें प्रारब्धच कांहीं चमत्कारिक
आहे असें समजलें पाहिजे. तर आतां तूं आपले ह-

किकत तरीं मला कळीव. " हे त्याचे शब्द, ऐकतांच आज्ञा प्रमाण ह्मणून तत्काळ आपला सर्व वृत्तांत त्यास श्रुत केला व ह्मणालों, " महाराज इतकीं जरीं दुःखें मी भोगिलीं आहेत, तरीं त्याचा परिहार आपल्या एका शब्दानेंच होणार आहे. माझें हें भाषण ऐकून त्याणें मोठ्यानें दुःखाचा उच्छ्वास टाकला; अगदीं भ्रमिष्टासारखा होऊन ह्मणू लागला नाहीं, च मेश्वरा, या प्रीतीच्या वेदना सर्व साक्षी मी ह्मणाले मजसारखा जो त्यांचे तडाके सोशीत असा त्यासच कळावयाच्या ? ज्याला त्यांचा अनुभव नाहीं, तो त्याविषयीं कसें बरें अनुमान करूं शकेल"? इतके ह्मणून त्याणें पुनः दुःखाचा सुस्कारा टाकिला. त्याच्या या चर्येवरून हा मजसारखाच दुःखी प्राणी आहे असें माझें पूर्ण अनुमान होऊन मोठ्या धैर्यानें मी त्यास ह्मटलें; "महाराज, आपण व मी समदुःखी आहों, तशांत अगदीं अकृत्रिम भावानें मी आपला साद्यंत इतिहास आपणास श्रुत केला आहे, तर आतां कोणताही विकल्प न आणितां आपला सर्व इतिहास मला सांगावा ; आपलें दुःख समजल्या नंतर त्याचा यथाशक्ति प्रतीकार करण्यास हा पामर काडीमात्र आळस करणार नाहीं." माझें भाषण ऐकून त्यासही थोडें समाधान वाटलें व हा आपला समदुःखी मित्र आहे असें समजून त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. आलेल्या उद्गाराचें उपशमन झाल्यानंतर त्याणें बोलण्यास प्रारंभ केला ; तो ह्मणाला

ला; "मित्रा, आतां तूं मला आपला मित्र असें समज, मी अगदी मोकळ्या मनानें आपला वृत्तांत तुला सांगतों. बाबारे, प्रीतिशरानें विद्ध झालेला असा हा जो तुझ्यापुढें हतभाग्य बसला आहे, हा या निमराज शहरचा राजा आहे. पुढें माझें जन्म व्हावयाचें, त्यापूर्वीं माझ्या पित्यानें जन्मकाल बराबर साधण्याकरितां अनेक देशांतून उत्तम उत्तम ज्योतिशी आणून बसविले होते. मी जन्मतांच त्यांणीं गणित करून माझ्या पित्यास सांगितलें कीं; हा पुत्र फार उत्तम वेळेवर जन्मास आला आहे. हा शिकंदर बादशाहा प्रमाणें सर्व पृथ्वीवर राज्य करील, नशरवाना प्रमाणें नितीमान होईल, कलाकौशल्यें आणि शास्त्रविद्या यांमध्यें उत्तम निष्णात होईल, प्रजेचें पालन पुत्राप्रमाणें करील, औदार्य व शौर्य, याविषयीं हातम व रुशतम ही याची बराबरी करूं शकणार नाहींत, फार काय ? याच्याकडे पाहिल्यावर त्या दोघां प्रसिद्ध पुरुषांचें स्मरण देखील लोकांस रहाणार नाहीं; या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; परंतु यास एक मोठें भय आहे, तें हें कीं; याला चवदा वर्षें परिपूर्ण होत पर्यंत सूर्य किंवा चंद्र याच्या दृष्टीस पडतां उपयोगी नाहीं. जर कदाचित तसें होईल, तर त्याला पिशाच बाधेसारखें वेड लागेल. पुष्कळांचा रक्तस्राव करील, विश्रांतिरहित होऊन अरण्यांत भटकत फिरेल, व पशुपक्ष्यांसह वास करील; याकरितां दिवसा किंवा रात्रीं नुस्तें आकाश देखील याच्या दृष्टीस पडूं नये, असा

बंदोबस्त ठेविला पाहिजे; एकदा चवदा वर्षे समाप्त झालीं, ह्मणजे मोठ्या गंभीर पणानें व दक्षतेनें राज्य करील व पुढें त्याच्या केशास ही धक्का लागणार नाहीं.

ज्योतिष्यांनीं याप्रकारचें भविष्य सांगितल्यामुळें माझ्या पित्यास फार वाईट वाटलें; तरीं पुढील शुभ लक्षणाच्या आशेनें त्याचें धैर्य बरेंच कायम राहिलें. त्याणें कामगार लोकांस तत्काल हुकूम करवून सर्व वाड्यासभोंवतीं छाया पडेल असा बाग लावण्यास व वाड्यांतही किरणांचा प्रवेश न होई अशा खोल्या करण्यास हुकूम केला. बहुधा सर्व वाड्यांत अहोरात्र दिव्यानेंच व्यापार होत असे. माझ्या शुश्रूषेकरितां उत्तम कुशल व ममताळू अशा अनेक दाई, दास व बटकी ठेविल्या होत्या. मी शब्दोच्चार करूं लागतांच माझ्या तैनातीस मोठमोठ्या विद्वान शिक्षकांची नेमणूक झाली; ते रात्रंदिवस मजला शिक्षण देत असत. माझा पिताही वारंवार येऊन बंदोबस्ताची देखरेख करीत असे. बाळपणचीं खेळणीं, व्यायामाची जागा, नानाप्रकारच्या पुष्पांच्या हांड्या वगैरे सर्व तेथेंच सिद्धता होती; यामुळें याहून दुसरा कांहीं पृथ्वीचा भाग असेल, अशी कल्पना देखील माझ्या मनांत आली नाहीं. याप्रमाणें त्या आंधारांत माझ्या वयाचीं दाहा वर्षे परिपूर्ण झालीं. एकेदिवशीं असा चमत्कार झाला कीं; त्या मंदिरामध्यें सूर्याच्या तेजाप्रमाणें एक सुंदर पुष्प माझ्या दृष्टीस पडलें. - अद्भुतचमत्कार वाटून जसजसी मी त्याकडे अधिक टक लाविली, तसतसें तें वाढूं लागलें.

अशामुळें तें घेण्याविषयीं माझी इच्छा झाली व मी यत्न करूं लागलों; परंतु जसजसा तें घेण्याविषयीं मी त्याजवळ जाईं, तसतसें तें ही मला चुकांड्या दिल्यासारखें इकडेतिकडे भ्रमण करी. हा चमत्कार पाहून मला विलक्षण आश्चर्य वाटलें, व त्यांतील खरें मर्म समजण्यासाठीं स्थिर दृष्टीनें मी त्यांकडे पाहूं लागलों, इतक्यांत कोणी मोठ्यानें हसावें अशा ध्वनी माझ्या कानीं आला; तेव्हां तर मला फारच आश्चर्य वाटलें. शब्दाच्या धोरणानें बारीक नजरेनें पाहूं लागलों, तों माझ्या खोलीचें छत दुभागून आंतून पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणें एक चेहरा माझ्या दृष्टीस पडला, व तो हळूहळू मजकडेसच येत आहे असें ही मला वाटलें. हा चमत्कार पाहून माझें ज्ञानबुद्धि व विचार यांचा क्षणमात्रांत लोप झाल्यासारखें झालें. कांहीं पळानें मला स्पष्ट दिसलें कीं; ती सुंदर मूर्ती मजकडेसच येत आहे. हा चेहरा एका सुंदर व तरुण स्त्रीचा होता. ही स्त्री एका अमूल्य रत्नजडीत सिंहासनावर बसली होती व तें सिंहासन चार अप्सरांनीं आपल्या खांद्यावर घेतलें होतें. त्या सुंदर स्त्रीच्या मस्कावर एक अवर्णनीय रत्नजडीत मुकुट होता, अंगावर सर्व जगांतही दुर्मिळ असा पोषाख होता व सरळ, गोंडस व मांसल हस्तामध्यें उत्तम मद्यानें भरलेला एक रत्नजडीत पेला होता. कांहीं पळांनीं तें सिंहासन भूमीवर उतरलें; ह्यावेळेस त्या मुख्य सुंदरीनें मला जवळ बोलावून सिंहासनावर आपल्या शेजारीं बसविलें. अहाहा! कायतो समय

आणि काय ती बहार !! मित्रा मी तर आपल्या मनांत भीतीनें अगदीं चूर होऊन गेलों होतों; परंतु त्या माषुक स्त्रीनें जे नखरे केले, त्यावरून माझी सर्व भिती नाहींशी होऊन ती खरोखरच मजवर प्रीति करिते असें मला भासलें. तिणें मोठ्या प्रेमानें मला आलिंगन दिलें, अनेक वेळा माझें मुखचुंबन केलें, कमलास किंवा उदकासही लाजविणारा कोमल हस्त अनेक वेळ माझ्या आंगावरून फिरविला; स्वहस्तानें मला मद्य पाजलें, सुवासिक अत्तरांचें माझ्या अंगास मर्दन केलें, व एक सुंदर तांबूल माझ्या मुखांत घातला. इतका थाट झाल्यानंतर मंजुल स्वरानें मला ह्मणाली; “मानवी प्राणी अगदीं अविश्वासी व घातकी असतात हें जरीं मला पक्कें ठाऊक आहे. तरीं मी अंतःकरणपूर्वक तुजवर प्रीति करित्यें.” हे हृदयभेदक सुकुमार शब्द ऐकतांच मला अतिशय आनंद झाला. खरोखर त्या वेळच्या सुखासीं जर तुलना करूं लागलों, तर चतुर्दश भुवनांतही तसें सुख मिळावयाचें नाहीं. असें मला वाटतें. मी निश्चयपूर्वक सांगतों कीं; त्या अवर्णनीय सुखाचा व प्रस्तुतच्या दुःखाचा अनुभव घेणारा असा सभाग्य व दुर्भाग्य, या सर्व जगामध्यें परमेश्वरानें मला एकट्यासच निर्माण केलें आहे. मित्रा, या महदानंदांत आह्मीं उभयतांही गढून गेलों असतां तें सर्व सौख्य एकदम लयास गेलें. आह्मां उभयतांचे हास्यविनोदादि विलास चालले आहेत इतक्यांत आकाशांतून एकाएकी चार आप्सरा भूमीवर उतरल्या. त्यांणीं आमच्या संनिध येऊन माझ्या प्रियेच्या

कानांत कांहीं मजकूर सांगितला. अहाहा ! तुला काय सांगूं ? ज्याप्रमाणें उत्तम पारिजातकाची कळी किंचित् वाफ लागली असतां एकाएकीं कोमेजून जाते, किंवा मातीचें ढेकूळ पाण्यांत पडेपडेतों विरघळून जातें, त्याप्रमाणें त्या भुवनसुंदरीचा चेहेरा एकदम उतरून गेला. तिणें डोळ्यास पाणी आणून सद्गद कंठानें मला ह्मणाली; " अरे हे माझ्या जिवलगा, आपल्या समागमें कांहीं काल तरीं आनंदानें वास करावा असें अंतःकरणांत फार होतें, आणि तसा प्रसंग आल्यामुळें मला अपरिमित आनंद झाला होता, पण माझें हें दुर्दैव आपल्या सारख्या मदन मूर्तीबराबर कसें राहूं देईल ? तें तर माझ्या पाठीस जसें हातच धुवून लागलें आहे ! असो, आतां जितका विस्मय करीन तितकें दुःख मात्र वाढणार आहे. तर आतां मला आज्ञा असावी ! परमेश्वर आपल्यास सुखी ठेवो व मजसारख्या कोणत्याही स्त्रीला आपल्या सेवेनें कृतार्थ करो." असें ह्मणून ती अगदीं स्तब्ध राहिली. तिच्या मुखांतून शब्दही निघेनासा झाला. मित्रा, ज्याप्रमाणें पुष्कळ प्रयासानें मिळवून आणलेला आंब्याचा पाड हातांत घेऊन चोखणार, इतक्यांत कोणी दुष्टानें थप्पड मारून हिसकावा, त्याप्रमाणें मला तें तिचें काळीज फाडणारें भाषण ऐकून व तिची ती सद्गद मुद्रा पाहून माझें मन अगदींच धैर्यहीन झालें. काय करावें आणि काय नाहीं याचें भानच नाहींसें झालें. शेवटीं प्रेमाश्रूनीं डवडवलेल्या नेत्रांनीं तिजकडे पाहून ज्याप्रमाणें चुंबकास लोह चि-

कटतें, त्याप्रमाणें एकदम तिच्या गळ्यास मिठी मारिली व मोठ्या दीन स्वरानें ह्मणालों; "प्रियतमे, माझ्या कलिजावर प्रीति'स्वर्गाचा वार करून कोणीकडे बरें जायेस? असें गाळांत फसविल्यासारखें करून निघून जाणें तुझ्या उदार मनास आवडतें काय? बरें असो तुझ्या इच्छेस आडवा येण्याची माझी चार घटिकांचा स्नेह असणाराची योग्यता नाहीं; परंतु एक गोष्ट तुला अवश्य सांगितलीच पाहिजे. तू जर खरोखर मजवर प्रीति करीत असशील, तर लवकर परत येऊन आपल्या कोमल करांनीं मला आलिंगन दे. नाहींतर पुढें माझ्या जीविताचीही आशा नाहीं. दुसरें एक सांगतों कीं; तूं आपलें, बापाचें, देशांचें व ठिकाणाचें नाव सांगून ठेव; ह्मणजे कदाचित परलोक गमनाचा प्रसंगच आला, तर वर जातानां या मार्गानें येऊन अंतरिक्षांतून तरीं तुझी शेवटची भेट घेईन व समाधान पावेन. अथवा आतांच ह्मणत असशील तरीं मी एका पायावर तयार आहें. मला या संपत्तीची किंवा कोणत्याही सुखाची इच्छा नाहीं. हाँ बोल, करूं तयारी?" माझें याप्रमाणें अगदीं उतावेळ भाषण श्रवण करून तिणें मला कडकडून कवटाळिलें. एकमेकांकडे पहाण्यास आमचे नेत्र फार उतावेळ झाले, पण करतात काय? उभयतांच्या डोळ्यांस सारख्या धारा चालल्यानें कांहींच दिसेना! एकमेकांच्या खांद्यावर डोकें टेकून रडतां रडतां दोघांचीहीं वस्त्रें भिजून चिंब झालीं. याप्रमाणें कांहीं वेळ गेल्यानंत

तिला जाण्याचा वेध असल्यामुळें आपल्या शोकाचा समारोप केला, आपले व माझे डोळे पुसले व मला नीट बसवून ह्मणाली; "माझ्या प्राणा, असें करणें ईश्वरास अगदीं आवडत नाहींत. इडापिडा टळो, ईश्वर आपणास दीर्घायु करो; जर आपण उभयतां जीवंत असलों, तर खचितच पुनः आनंदाचा दिवस उगवेल व आपली भेट होईल. मी यक्षराजाची कन्या आहें काफ नावाच्या पर्वतावर रहात्यें. आतां स्वस्थ चित्तानें परमेश्वराची प्रार्थना करून समाधान माना, मला अगदीं अवकाश नाहीं, आतां आज्ञा असावी." असें ह्मणून तिणें पुनः मला आलिंगन दिलें, माझें मुख कुर्वाळिलें व आपल्या सिंव्हासनांत बसली. ज्याप्रमाणें पूर्वी मजकडे पहात पहात आली होती, त्याचप्रमाणें मजकडे पहात पहात ती अदृश्य झाली. माझ्या नेत्रांच्या आड तो माषुक चेंहरा होतांच लागलाच मी बेशुद्ध पडलों. कांहीं वेळानें सावध झाल्यावर पहातों तों कांहींच नाहीं. एकदा वाटे मी हा खेळ स्वप्नांत तर पाहिला नसेलना? पुनः शरीराकडे दृष्टि गेली, आणि तिच्या छातीच्या कस्तूरीच्या वेली, कपाळाचें कुंकुम, रडतांनां पाझरलेलें डोळ्यांचें काजळ, मानेस लागलेला मस्तकांतील मसाल्याचा घमघमाट इत्यादि खुणा स्पष्ट दृष्टीस पडल्या ह्मणजे तिची ती मनोहर मूर्ति हुबेहुब डोळ्यांपुढें उभी रहावी, खरोखरच जवळ आहे असें वाटन हाका माराव्या, आलिंगनाकरितां बाहु पसरावे; परंतु शेवटीं एकटाच्या एकटा. असें जेव्हां होऊं लागलें तेव्हां मला रडाव्याचे

वांचून कांहींच सुचेनासें झालें. डोकें आपटलें, वस्त्रें फाडलीं, नाना प्रकार केले; परंतु उपयोग काय? शेवटीं मी आपल्या जिवाविषयीं अगदीं बेवर्वा झालों, अन्नपाणी सोडिलें भाषण वर्ज्य केलें, अशा रीतीनें कांहीं दिवस लोटले. अन्नोदकावांचून शरीर तें कसें चालेल? अगदीं शुष्क होऊन अस्थिचर्म मात्र राहिलें. ही माझी भयंकर स्थिती पाहून तैनातीस असलेल्या दासदासी फार भ्याल्या. त्यांणीं मी खावें, प्यावें, झोंप घ्यावी म्हणून पुष्कळ उपाय केले; परंतु शेवटीं अगदीं निरुपायानें माझी ही अवस्था राजाच्या (माझ्या बापाच्या) कानावर घातली. अहाहा! मित्रा, त्यावेळेस माझ्या पित्याला किती दुःख झालें असेल याचें अनुमान तूंही करूं शकशील. त्याणें आपले प्रधान, भविष्यवादी, ज्योतिषी, वैद्य वगैरे अनेक लोकांस बरोबर घेऊन माझ्या बागेंत आला. मी अगदीं व्याकूळ पडलों होतों, मला पाहून तर तो फारच घाबरला. मला पोटाशीं धरून धाय धाय रडला व त्याणें आपल्या आश्रितांस मला बरा करण्याविषयीं तावडतोब उपाय करण्याची आज्ञा केली. वैद्यांनीं नानाप्रकारची पौष्टिक औषधें दिलीं, मांत्रिकांनीं मंत्रोच्चार करून माझ्या आंगावरून झाडणी केली, कित्येकांनीं ईश्वराची प्रार्थना केली, अशी नानाप्रकारें करून मजवर उपायांची गर्दी झाली. कोणी म्हणत रोग, कोणी म्हणत पिशाच, कोणी म्हणत ग्रहपीडा, कोणी म्हणत जन्मकालच्या भविष्याप्रमाणें आत्मा

तील एकादा तारा याचे दृष्टीस पडला असेल. या प्रमाणें नानाप्रकारचे तरंग निघूं लागले; परंतु माझ्या खऱ्या रोगाचें निदान एकाच्याही हातून झालें नाहीं. दिवसानुदिवस शुष्क होतां होतां सुमारें तीन वर्षें गुदरलीं. त्या वेळीं मी केवळ हाडांच्या पिंजऱ्यासारखा दिसत होतों. माझ्या या दुःखास चवथे वर्षी एक मोठा व्यापारी आमच्या राजधानीस आला. त्याणें शिष्ट संप्रदायाप्रमाणें अनेक देशांतील मासलेवाईक जिनसा राजास नजरकरून त्याची भेट घेतली; राजानें ही तो नजराणा स्वीकारून व्यापाऱ्याचा मोठा सत्कार केला.

एकेदिवसीं उभयतां इकडील तिकडील गोष्टी बोलत असतां राजानें त्यास माझी हकीगत सांगून विचारलें कीं; "आपण पुष्कळ मुलुख फिरलां आहां, तर एकादा नामांकित वैद्य तुमच्या पहाण्यांत आला असल्यास मला सांगा." राजाचें हें वचन ऐकून सावकारानें एका साधूचें नांव घेऊन त्याची कथा सांगण्यास प्रारंभ केला. तो ह्मणाला; "महाराज, हिंदुस्थानांत गंगानदीमध्यें एक पर्वत आहे, त्यावर एका जटाधारी गोसाव्यानें एक सुंदर महादेवाचें देवालय, स्वतःसाठीं मठ व एक बाग असें तयार केलें आहे, व तो स्वतः तेथेंच रहातो. तो दरसाल महाशिवरात्रीच्या दिवसीं मठाबाहेर पडत असतो, व त्या नदीमध्यें स्नानकरून परत जातांना त्याच्या बागेच्या दरवाजांत शहरांतील व बाहेरचे रोगी जमलेले असतात.

त्या सर्वांची नाडी व मूत्रपरीक्षा करून प्रत्येकाच्या रोगाप्रमाणें त्यास औषध व पथ्य लिहून देतो. ईश्वरानें त्याच्या हातास असें कांहीं यश दिलें आहे कीं; त्याचें औषध घेतांक्षणींच रोग नाहींसा होतो. महाराज, हा सर्व प्रकार मी स्वतः आपल्या डोळ्यांनीं पाहिला आहे. जर आज्ञा होईल, तर हा सेवक राजपुत्रास त्या साधूकडे घेऊन जाण्यास सिद्ध आहे. मी प्रतिज्ञापूर्वक सांगतों कीं; राजपुत्रास जर त्याचें औषध मिळेल, तर निःसंशय रोगनिवृत्ति होईल. राजपुत्रास येथून तिकडे नेल्यानें हवेंत व पाण्यांत फेर बदल होईल, व तो साधु तर ईश्वर प्रसादिकच आहे, यामुळें माझें पूर्ण मत आहे कीं; महाराजांनीं कांहीं एक विकल्प न आणितां राजपुत्रास त्या गोसाव्याकडे नेण्याची योजना करावी." याप्रमाणें सावकाराचा उपदेश ऐकून राजा फार आनंदी झाला व प्रसन्नमुद्रेनें त्यास म्हणाला ; "वाहवा ! शेटसाहेब यावेळीं मी आपला फार उपकारी आहें. खरोखर अशा सत्पुरुषाच्या हातूनच झाला तर माझा पुत्र बरा होईल. तर आपणही बरोबर तेथपर्यंत यावें." सावकारानें तें मान्य केलें व माझ्या पित्यानें मार्गाचा सर्व बंदोबस्त करण्यास हुकूम दिला. माझ्या प्रकृतीविषयीं इतका बंदोबस्त ठेविला होता कीं; कोणतीही इजा मला होऊं नये. याप्रमाणें आह्मी सर्व जहाजांत बसून कित्येक दिवसांनीं त्या ठिकाणीं जाऊन पोहचलों. मार्गांतील वेगळाल्या प्रकारची हवा लागल्यानें माझी प्रकृति बरीच सुधारत चालली; परंतु

माझ्या मनांतील व्याधि जाण्यास कांहींच औषध मि
ळालें नाहीं. तिची ती मनोहर मूर्ति माझ्या डोळ्यां
पुढून एक निमिषभरही एकीकडे होईना. माझ्या तों
डांतून कधींकाळीं जे शद्ब निघत, ते फक्त त्या सुंद
रीच्या संबंधानें याप्रमाणें सुमारें तीनचार महिने लो-
टले. इतक्या दिवसांत सुमारें चार हजार रोगी तेथें
जमले व सर्व बुवा बाहेर येण्याची वाट पहात बसले.
पुढें थोडक्याच दिवसांनी महाशिवरात्र आली व नि-
यमाप्रमाणें प्रातःकालीं तो गोसावी बाहेर आला.
अहाहा ! नेहमीं एकांतवासांत एकासनावर रहात असे,
पण मित्रा, त्याचें तेज इतकें देदीप्यमान होतें कीं,
शुद्ध सूर्योदयच झाला असा भास होई. त्याणें नदींत
जाऊन स्नान केल्यानंतर अंगास भस्म लाविलें, जटा
बांधल्या व आपल्या नियमाप्रमाणें कांहीं विधि केला.
त्याचें सर्व आटपल्यावर अंगावर एक सफेत छाटी व
पायांत पादुका घालून तो आमच्या इकडे आला.
प्रत्येक रोगी आपली हकीकत सांगे व तो त्याची
परीक्षा करून एका लहानशा कागदावर त्यांजजवळ
कांहीं लिहून देई. असें होतां होतां मजवर पाळी आली.
मजकडे पहातांच तो प्रारंभीं अगदीं स्तब्ध राहिला.
व बाकी सर्व रोग्यांस मार्गस्थ करून माझ्यासह बागेंत
गेला. तेथें गुप्त कोठडींत मला ठेऊन ह्मणाला; "तूं
येथें बैस, मी आपल्या कार्यास जातों." याप्रमाणें सां-
गून तो निघून गेला व मी एकटाच तेथें राहिलों. जरीं
एकटा होतों, तरीं त्या सत्पुरुषाच्या कृपेनें मला दिवसें-

दिवस हुशारी वाटूं लागली. चाळीस दिवसांनीं तो बुवा पुनः मजकडे आला व मजकडे पाहून हसून ह्मणाला; "बेटा आतां हुषार आहेसना? आजपासून विश्रांती-करितां तूं या बागेंत फिरत जा व इच्छेस वाटेल तें फळ खात जा." असें ह्मणून त्याणें माझ्या हातीं एक माजमेची बरणी दिली व तींतून नित्य अर्ध तोळा माजूम खाण्यास सांगितलें, आणि आपण निघून गेला. मी त्याच्या आज्ञेप्रमाणेंच वर्तत असें, त्यायोगानें माझी प्रकृति तर हुषार होत चालली; परंतु त्या मृगाक्षेची मूर्ति माझ्या दृष्टीवेगळी होईना.

एके दिवशीं सहजावृत्या खोलींतील एक फडताळ उघडलें, त्यांत एक पुस्तक होतें. तें घेऊन वाचूं लागलों त्यांत इह व परलोकसंबंधीं भविष्यें लिहिलीं होतीं असें वाटलें. - ह्मणून मी लक्षपूर्वक वाचूं लागलों. तें इतकें सुंदर होतें कीं; त्यांत पाहिजे तो प्रकार लिहिला होता. मला त्याची गोडी लागून मी तें वाचण्याचाच उद्योग चालविला. मला वैद्यक शास्त्राची माहिती बरीच असल्यामुळें त्या पुस्तकापासून मला फार चांगला उपयोग झाला. त्याजपासून मला थोडीथोडी मोहिनी विद्याही येऊं लागली याप्रमाणें सुमारें एकवर्ष संपून पुनः महा शिवरात्री आली. नियमाप्रमाणें गोसावी बाहेर येतांच मी त्यास मोठ्या नम्रतेनें प्रणाम केला. त्याणें मजपाशीं लिहिण्याचें कलमदान देऊन आपणाबरोबर घेतलें बुवाचीं नैमित्यिक कर्में आटपल्यानंतर आह्मी उभयतांनीं रोग्यां

कडे आलों. शरीरानें व प्रकृतीनें सुराक्षित अशा प्रकारचा मी आपल्या लोकांच्या दृष्टीस पडतांच त्यांणी तत्काळ बुवाची व परमेश्वराची पुष्कळ स्तुति केली. गोसाव्यानें नेहमीच्या क्रमाप्रमाणें सर्व रोग्यांची परीक्षा करून त्यांस औषधें वगैरे लिहून दिलीं, पण हा सर्व वेळ त्याची दृष्टी, त्या रोग्यांतील एका वेड्यावर एकसारखी जडून गेली होती. सर्व रोगी तपासल्यानंतर पुनः मठींत येतानां त्या वेड्यास बराबर घेण्यास मला हुकूम केला, आह्मी तिघे बागांत आल्यानंतर तिघेही बुवाच्या बसावयाच्या खोलींत गेलों, नंतर बुवानें त्या वेड्याच्या डोक्याची कवठी शस्त्रानें मोठ्या सफाईनें काढून डोक्यांत जी घोण [ गोम. ] मेंदूवर होती, ती चिमट्यानें काढूं लागला; परंतु तिला मेंदूंत शिरवियास पुष्कळ जागा असल्यामुळें ती अधिकच आंत शिरूं लागली, तेव्हां मी बुवास एक युक्ति सांगितली ती ही कीं; "चिमटा तापवून तिच्या पाठीवर ठेवल्याबराबर ती उसाळी मारून बाहेर येईल" माझें मत गोसाव्यास पसंत पडून त्याणें तत्काल तसें केलें व गोम काढून टाकून त्याची कवटी शिवली आणि त्यास एकदम निघून जाण्यास हुकुम दिला, नंतर तो मला ह्मणाला; "बेटा, शाबास तुझी बुद्धि फार चांगली आहे, आतां माझें दुनियेतील संपूर्ण कर्तव्य संपलें" असें ह्मणून तो बाहेर गेला व आपल्या जटेचा गळ्यास फास लावून एका झाडापाशीं त्याणें प्राणघात केला, मी त्याचा शोध करितों तों हा

असा भयंकर देखावा माझ्या दृष्टीस पडला, अहाहा! मित्रहो, त्या वेळची माझी अवस्था आतां तुह्मींच लक्षांत आणा, असो! कांहीं वेळ मी त्या करितां शोक करून मनाचें शांत्वन केलें व त्या प्रेताच्या उत्तर संस्कारास लागलों, त्यास मी झाडापासून सोडवीत असतां जटेंतून दोन किल्ल्या बाहेर पडल्या, त्या शिखांत घालून यथाविधि प्रेतसंस्कार केला. पुढें मी बागांत जाऊन प्रत्येक कुलपास त्या किल्ल्या चालवून पाहूं लागलों तों प्रारब्ध संस्कारानें त्या किल्ल्यांनीं कांहीं कुलपें उघडलीं. आंत पहातों तों भूमीपासून तक्तपोशीपर्यंत सारखी रत्नाची ठेल लागून गेली होती. खोली उघडल्याबरोबर त्यांचा जो कांहीं लोकोत्तर प्रकाश पाहिला, त्याणें तर माझी दृष्टी एकदम स्तब्ध झाली. ही संपत्ती पाहून आनंदतर झालाच, पण पुढें जी एक दुसरी अमूल्य वस्तु मिळाली, तिच्या प्राप्तीनें त्रैलोक्याचें राज्य मिळाल्यापेक्षांही मला विशेष आनंद झाला. एका मखमलानें मढविलेल्या सुंदर पेटींत सर्व गोष्टींचें ज्यांत उत्तम प्रकारचें विवरण होतें असें पुस्तक सांपडलें; त्यांत वैद्यक, ज्योतिष, कौशल्य, वेदांत, जारण मारणादि मांत्रिक, यक्ष, अप्सर, विद्याधरांदिकांस वश करण्याचीं साधनें वगैरे सर्व कांहीं होतें. यामुळें तें पाहून माझा आनंदवृक्ष चतुर्दश भुवनासही ठेंगणा मानूं लागला. नंतर मी लागलेंच बागेचें द्वार उघडून माझ्या सर्व नोकरांस आंत घेतलें व त्यांजकडून तो सर्व माल काढून तार-

इतोब आपल्या शहरीं जाण्यासाठीं जहाजें भरण्यास त्यांस हुकूम केला. कांहीं दिवसांनीं मी आपल्या शहरास पोंचलों. मी आल्याची बातमी माझ्या बापास समजतांच त्याणें सर्व नगरांत उत्साह करण्याविषयीं हुकूम करून मोठ्या आनंदानें स्वतः मला भेटावयास आला. पित्याची व माझी भेट होतांच दोघांसही अतिशय आनंद झाला. आनंदाश्रूंनीं आह्मी परस्परांचीं वस्त्रें भिजवून चिंब करून सोडलीं. देवदर्शनादि विधि झाल्यानंतर मी आपल्या राजवाड्यांत गेलों, राज्यांतील मुत्सद्दी, दरकदार, मानकरी वगैरे लोक मला पहाण्यासाठीं दुतर्फा सारखे हारीनेंच उभे राहिले होते, त्या सर्वांनीं आनंदप्रदर्शक शब्दांनीं मला मुजरे केले व ते मी मोठ्या नम्रतेनें स्वीकारून मीही त्यांस सलाम केला. कित्येक वेळपर्यंत इकडच्या तिकडच्या खुषखबरा झाल्यानंतर दरबार बरखास्त झालें व आह्मी उभयतां पितापुत्र भोजनेंकरून पुनः रंगमहालांत येऊन बसलों. त्यावेळीं मी आपल्या पित्यास मोठ्या आर्जवानें प्रार्थना केली कीं; मला माझे जुने बागेंतील घरांत राहण्यास आज्ञा असावी. माझ्या हेतुस बाप प्रथम कबूल होईना, त्याणें शेकडो अडचणी सांगितल्या, दुसरे शेकडो उत्तम बंगले सांगितले; परंतु माझा निर्धार पाहून शेवटीं त्यास तें मान्य करणें भाग पडलें. मी त्या एकांतस्थलीं जाऊन राहिल्यानंतर यक्षास आपल्या ताब्यांत घेण्याचा यत्न चालविला. मला जें पूर्वीं पुस्तक

मिळालें होतें, त्यावरून उपासादि व्रतें पाळून मंत्रजपास प्रारंभ केला. चाळिसावे दिवशीं मध्य रात्रींच्या सुमारास एकदम मोठी वाहूटळ सुटली, कित्येक मोठाले वृक्ष व इमारती पडून जमीनदोस्त झाल्या, जिकडे तिकडे अप्सरांचें लश्कर दिसूं लागलें व शेवटीं एका सिंहासनावर एक तेजःपुंज व भव्य पुरुष बसून अंतरिक्षांतून खालीं मजकडे येत आहे असें दिसलें. थोड्याच पळांनीं तो खालीं आला, तेव्हां हाच यक्षांचा राजा अशी माझी खात्री होऊन मोठ्या नम्रतेनें मी त्यास प्रणाम केला. तेव्हां त्याणें मला विचारिलें, "बाबारे, इतका प्रयास करून मला येथें आणण्याचें कारण काय?" हीं त्याच्या मुखांतील अक्षरें ऐकतांच मी निःशंकपणें त्यास ह्मणालों; "महाराज, या हतभाग्याची आपल्या कन्येवर फार दिवसांपासून प्रीति जडली आहे, तिजकरितां मी आजपर्यंत अनेक संकटें भोगिलीं आहेत व खरोखरच प्रस्तुत हे प्राण तिच्या दर्शनासाठींच राहिले आहेत तर आतां इच्छा असेल तर या दीनाचें रक्षण करा किंवा हनन करा; मी शरणागत ह्मणून तयार आहें."

माझें हें भाषण ऐकून तो ह्मणाला; "बाबारे, ईश्वरानें या मनुष्यामध्यें इमान फार थोडें ठेविलें आहे, तशांत यक्ष आणि मनुष्य यांचा संयोग कदाचित् अग्नितृणाप्रमाणेंही ह्मणतां येईल; मग तूं ह्मणतोस ही गोष्ट कशी बरें होऊं शकेल?" हें त्याचें भाषण ऐकतांच मी शपथ वाहून त्यास सांगितलें कीं; "मी

आपल्या कन्येच्या दर्शनाविषयीं मात्र भुकेला आहें, तेव्हां आपल्या कल्पना काय कामाच्या ?" पुनः यक्ष ह्मणाला ; "मुला, तुझी तारुण्याची धुंदी आहे, कदाचित् वाईट वासना धरशील तर तुह्मा दोघांसही अपाय घडेल." मी पुनः ह्मटलें ; " महाराज, माझेंतर असो, पण ह्या पारिजातक पुष्पाला धोका अणणारी अशी गोष्ट मजपासून कालत्रयीं घडणार नाहीं. मी फक्त तिचा तो मनोहर चेहेराच पाहून तृप्त आहें " असा आमचा संवाद चालला आहे, तों माझ्या प्रीतीचें भांडार जी ती अप्सरा, ती पूर्वींप्रमाणें विमानांत बसून अंतरिक्षांतून खालीं उतरली ; अहाहा, मित्रहो, मी क्षमा मागून बोलतों, मी या डोळ्यानीं जो बहार लुटला आहे, त्याचें वर्णन करण्यास एकवार कृपा करून परवानगी द्या. केतकीच्या वर्णाप्रमाणें कपाळाचा गोरवर्ण, त्याजवर बारीक व वाकडे लोंबणारे कुरळ केश, त्यापुढें घातलेला हिरवाचार पाचूचा त्रिजवरा, त्याच्या प्रभेनें भालप्रांतास आलेली चमत्कारिक हिरवी कांती व त्यावर थोडथोडे उत्पन्न झालेले घर्मबिंदु इतका थाट जेव्हां पाहिला, तेव्हां मला शुद्ध कमलवाटिकेचाच भास झाला. अहाहा ! डोळ्यांची खुमारी काय सांगूं ? गोकर्णाप्रमाणें थेट कानापर्यंत ज्यांचीं अग्रें, सुरूच्या ताटव्याप्रमाणें सारखी पापण्यांची रांग, मद्यप्राशन केल्याप्रमाणें सहाजिक लाली, त्यांत काळेभोर बुबळें, व विद्युल्लतेप्रमाणें त्यांचीं चंचळगति, इतक्यांचा वर्षाव एकदम ज्याच्या मनावर होईल, त्याची काय अवस्था होईल हें तुह्मीच सांगा !

नाक सरळ व त्यांत सुंदर सरजांची नथ, गाल गोंडस, गुलाबि व पिवळ्या छबेचे, ओठ पोवळ्यासारखे सहाजिक लाल, हिऱ्यासारखी दातांची रांग, गालांत थोडथोडें हसणें व त्याणें पडणाऱ्या गालाच्या खाचा या पाहिल्याबराबर चुंबनावांचून तेथें कोणताबरें व्यापार सुचनार आहे? मित्रहो, तिचे बाहू आणि कर किती मजेचे ह्मणून सांगूं; त्यांचा विळखा ज्याच्या अंगास पडेल तोच भाग्यवान! हृदयाकडे जेव्हां दृष्टी दिली, तेव्हां समोर, ताठ आणि घट्ट असे दोन उंचवटे एकमेकांस चिकटलेले जरतारी चोळीच्या चोळींतून पाहिले, प्रारंभीं हें काय असावें, चक्रवाकांचा जोडा, किंवा इच्या तारूण्य राजाचे द्वारपाल, किंवा कांहीं कृत्रिम कंदुक, याविषयीं मला अनुमान होईना, पण शेवटीं ते स्तन अशी खात्री झाली. कटी बारीक, नितंब थोर व मांसळ, त्यावर आकाशगंगेसारखी चकाकणारी सारखी कासोट्याची पट्टी, केळीच्या गाभ्याप्रमाणें मांड्या रसरसित, पाय मृदु व अरक्त; असे सर्व अवयव रेखलेले होते; त्या दिवशीं तिणें पांढरा व बुटीदार जरतारी शालू नेसून अस्मानी रंगाची चोळी घातली होती अंगावर एकंदर रत्नाचेच अलंकार घातले होते. असो, ती येतांच यक्षांचा राजा आपल्या व तिच्या सेवकांसह परत गेला व आह्मी उभयतां ब्रह्मानंदाच्या भांडारावर दरवडा घालण्यास तयार झालों. मित्रा! त्या वेळची बहार सांगण्याला खरोखरच अशक्य आहे. यक्षानें घातलेल्या भीतीमुळें मी अगदीं जपून वागत असे. हा

स्यविनोद व आलिंगन चुंबन, यांवाचून कांहींच विधि केला नाहीं, तरीं ती मला नित्यशः तें पवित्र पुस्तक संभाळण्याविषयीं ताकीद करीत असे. एके दिवशीं आह्मी उभयतांही आनंदांत असतां कामपीडेनें मी फार घायाळ झालों व त्या भुवनसुंदरीस घट्ट आवळून आतां पुढें तिच्या तारुण्यामृताचें प्राशन करणार, इतक्यांत "तें पुस्तक मजकडे द्या, त्या पवित्र नामास बाटवूं नका" असा एक ध्वनि निघाला; मी अगदीं बेफाम आसल्यामुळें कांहीं एक विचार न करितां पुस्तक त्याजकडे फेकलें; त्या बराबर ती काममंजरी ह्मणाली, "अहारे विचारशुन्या, शेवटीं उपदेश विसरून घात केलास" इतकें बोलून बेशुद्ध झाली. अहारे! अचिंत्यगति प्रारब्धा!!!

मित्रा, हें काय झालें ह्मणून मी वेड्यासारखा पहात आहें, तो विछान्याच्या उशासीं माझें पुस्तक घेऊन एक यक्ष उभा आहे,असें पाहातांच मी त्यापासून हिसकून घेण्याचा यत्न करीत आहें तों दुसरा एक यक्ष येऊन त्याणें तें पुस्तक घेऊन धाव मारिली. शेवटीं मी कांहीं जादू करून त्या राहिलेल्या यक्षास बैल केलें; व प्रस्तुत ज्यावर मी स्वारी करितों, तो बैल तोच होय परंतु माझा कोणताही मंत्र त्या प्राणप्रियेस शुद्धीवर आणण्यास उपयोगी पडला नाहीं, व शेवटीं मी अगदीं वेड्यासारखा होऊन या बागेचा आश्रय केला. प्रस्तुत मनाला कांहीं तरीं कर्मणूक करण्याकरितां मी पाचेचा एक तंबू देऊन त्या बैलावर बसून प्रत्येक महिन्यास तूं पाहिल्या ठिकाणीं एका मनुष्याचा वध करून येतों."

इतकें सांगून त्याणें माझ्या गळ्यास मिठी मारिली व धाय धाय करून मोठ्या आक्रोशानें रडला.

याप्रमाणें त्याची अवस्था पाहून त्याचें पुष्कळ रीतीनें समाधान केलें, परंतु त्याच्या दुःखाचा काडी-मात्र उपशम होईना; शेवटीं त्या अप्सरेचा शोध काढण्याकरितां त्या राजपुत्राची आज्ञा घेऊन निघालों. खरोखर माझें काम जरीं झालें होतें, तरीं मला राज-पुत्राचें दुःख पहावेना! अप्सरेचा शोध करण्यांत काडीइतका आळस केला नाहीं, रानें, डोंगर, गुहा, नद्या, सरोवरें वगैरे सर्व शोधिलीं, व शेवटीं निराश होऊन प्राणत्याग करण्याच्या निश्चयानें एका पर्वतावर चढलों व आतां कड्याखालीं उडी घालणार, इतक्यांत एक घोडेस्वार आला व माझा हात धरून ह्मणाला; "ईश्वरी प्राण्या, व्यर्थ आत्महत्या कां कारितोस. आतां सर्व इच्छा पूर्ण होतील. रोम शहरांत तुला तुजसारखे कातवलेले तिघे मुशाफर भेटतील व तेथील राजा अजादबख्तही महद्दुःखांत आहे, त्याचीही तुमची गाठ पडेल. तुह्मी पांच असामी एकत्र झालां कीं; तुह्मा सर्वांच्या इच्छा पूर्ण होतील." मित्रहो, त्याणें आपलें नांव मुरताजअल्ली सांगून गुप्त झाला व त्याच्या वचनावर विश्वास धरून येथें आलों, तों आपली भेटी झाली; आतां फक्त राजाची गाठ पडली पाहिजे ह्मणजे आपण सर्व दुःखमुक्त होऊन राहिलेलें आयुष्य आनंदांत घालवूं." इतकें ऐकून सर्वांनीं तथास्तु ह्मणून मोठ्यानें ध्वनि केला.

समाप्त.

## या पुस्तकास ज्या उदार गृहस्थांनीं आश्रय दिला त्यांची नांवें.

| | |
|---|---|
| डा० भाऊ दाजी . . . | २ |
| श्रीकृष्ण वासुदेवजी . . . | १ |
| रघुनाथ दामोदर . . . | १ |
| बाळकृष्ण हरीश्चंद्रजी . . . | १ |
| मल्लनाथ गोविंदजी . . . | १ |
| विनाएकराव पराडकर . . . | १ |
| भास्कर गोविंद . . . | १ |
| रघुनाथ शंकर शास्त्री . . . | १ |
| विनाएक हरीश्चंद्र . . . | १ |
| जनारदन रामचंद्र . . . | १ |
| नानाभाई रामचंद्र . . . | १ |
| सिताराम धाकजी . . . | १ |
| डी. एच. डेवीड . . . | २ |
| आनंदराव रामचंद्र . . . | १ |
| नारायण लक्षुमण . . . | १ |
| काशीनाथ बापू जोशी . . . | १ |
| हरीश्चंद्र विठोबा . . . | १ |
| द्वारकानाथ सदानंद . . . | १ |
| श्यामराव अंबरनाथ . . . | १ |
| मोरोबा हरीश्चंद्रजी . . . | १ |
| गणपतराव रामचंद्रजी . . . | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रामचंद्र हरीश्चंद्रजी | . | . | . | १ |
| घनशाम तात्याजी | . | . | . | १ |
| शिवशंकर काशीनाथ | . | . | . | १ |
| रामचंद्र भवानीशंकर | . | . | . | १ |
| कृष्णराव रामचंद्रजी धुरंधर. | | . | . | १ |
| रामचंद्र केशीनाथ देसाई | . | . | . | १ |
| एन. के. धुरंधर | . | . | . | १ |
| मोटाभाय बापुजी | . | . | . | १ |
| नानाभाय हरी त्रिंबक | . | . | . | १ |
| सोकाजी बालाजी | . | . | . | १ |
| सोलेमान आब्राहामजी. दि. क. मु. | | | . | १ |
| शालोम आहारोनजी. दी. क. मु. | | . | . | १ |
| शालोम सामाजी कुरूळकर दाक्तर पे | | | . | १ |
| दानिएल ईसुबजी तळकर दा. पे. | | . | . | १ |
| हाईम इसाजी गारसुलकर | . | . | . | १ |
| हास्केल ईसुबजी तळकर आणि मुलगा | | | . | १ |
| आहारोन दानिएलजी तळकर | | . | . | २ |
| हिलेल मुसाजी उमरडेकर पाँ. ई. | | . | . | १ |
| हास्केल दाविदजी दिवेकर. आ. पाँ. ई. | | | . | १ |
| जैकीसनदास लक्ष्मीदास | . | . | . | १ |
| मेखाएल हिलेल उमरडेकर. | | . | . | १ |
| मोशे हिलेल उमरडेकर | . | . | . | १ |
| लेवी हास्केलजी तळकर | . | . | . | १ |
| याफेत रेकबेनजी पुगावकर. | | . | . | १ |
| दानिएल मोशे तळकर | . | . | | १ |

| | |
|---|---|
| आब्राहाम दाविदजी सायगांवकर डाक्तर | १ |
| बीनयामी आब्राहामजी चरीकर जमादार | १ |
| सालोमन रुबेनजी आवासकर | १ |
| सालोमन ड्यानीएल | १ |
| लक्षमण गोपाळ | १ |
| दाविद शलोमो बोरघरकर चे. | १ |
| शालोम शलोमो बारघरकर सरवेर | १ |
| सीलिमान राहामीम तळकर रैटर | १ |
| रोबेन हाईमजी आप्टेकर | १ |
| सीलेमान हास्केलजी नौगांवकर | १ |
| वालजी केशव पेन्टर | १ |
| रोबेन आब्राहामजी कोरलेकर | १ |
| शालोमन बाळाजी पेझारकर | १ |
| रोबेन आब्राहामजी भिन्जीकर | १ |
| बीनयामीन बाळाजी तळकर | १ |
| शेक माहामद हेड फीटर | १ |
| राहामीम सीलेमानजी तळकर यें. ई. म्यु. डी. | १ |
| बाबुल रावजी | १ |
| सखाराम हरजी | १ |
| कृष्णा केशवजी | १ |
| मोरोबा माणीकजी | १ |
| विश्वनाथ विठोजी | १ |
| शामराव भाऊ | १ |
| विनाएक रामचंद्रजी | १ |
| गणपतराव मोरोबा | १ |

| | |
|---|---|
| विठ्ठल बाळकृष्ण कामत हनमतकर . . | १ |
| रामचंद्र सदाशिव राजाध्यक्ष . . | १ |
| गोविंद वासुदेव . . . | १ |
| विठ्ठल वामनराव धुमे . . . | १ |
| बाळकृष्ण विठ्ठल . . . | १ |
| रामचंद्र नारायण पटवरधन . . | १ |
| परशोत्तम आत्माराम . . . | १ |
| भिकू रणछोड दळवी . . . | १ |
| विश्वनाथ शिवशंकर . . . | १ |
| गजानन मकुंदजी . . . | १ |
| आबाजी गोपाळ . . . | १ |
| विष्णू रामचंद्र गोंदाव्रे . . . | १ |
| बाबुल आनाजी ठाणेकर . . . | १ |
| नारायण बापुजी . . . | १ |
| पंदरनाथ मकुंदजी . . . | १ |
| बाळकृष्ण दामोदरजी . . . | १ |
| नानाभाई गोपाळराव फोटोग्राफर . . | १ |
| केशव शिवराम भंडारी . . . | १ |
| पांडूरंग बाळकृष्णजी चांचढ . . | १ |
| सदाशिव गणोत्रा . . . | १ |
| गणपत आनंदराव . . . | १ |
| गोपीनाथ शंकरजी . . . | १ |
| आब्राहाम दानिएल कुरूळकर . . | १ |
| बाळकृष्णा दीनानाथजी पिंगळे . . | १ |
| रावजी पांडूरंग . . . | १ |

| | | |
|---|---|---|
| विठोबा येसोबा | . | १ |
| रामचंद्र रघुनाथ | . | १ |
| विश्वासराव रामचंद्रजी | . | १ |
| शिवशंकर विश्वनाथजी | . | १ |
| आत्माराम माणीकजी | . | १ |
| महादेव रामचंद्र ज. पो. ऑफीस | . | १ |
| बापु चांगोजी | . | १ |
| शीमशोन मोशे दिवेकर | . | १ |
| फकीर हरी | . | १ |
| विठोबा बाबाजी | . | १ |
| दीनकर बल्लाळ जुवेकर ओ. फोरमेन | . | १ |
| गोविंद जनारदन जोशी | . | १ |
| स्यामुएल मोझेस भोनकर | . | १ |
| मोझेस बेज्यामीन स्टेशन मास्तर | . | १ |
| यशवंत गणू | . | १ |
| बाळाजी विठोबा कांसार | . | १ |
| मोशेजी बीनयामीनजी कुरूळकर | . | १ |
| सीमओनजी ईसाकजी ईवलेकर | . | १ |
| आत्माराम दामोदर | . | १ |
| पांडू गोविंद | . | १ |
| कृष्णाजी राजबा | . | १ |
| माहादु शिवराम कंपाँझीटर | . | १ |
| महादु सतुजी | . | १ |
| मोशे आहरोन नागावकर | . | १ |
| रानु खंडू | . | १ |
| हाईम सीलेमान गालसुलकर | . | १ |

| | | |
|---|---|---|
| मोरोबा धोंडजी कारलेकर | . | १ |
| भास्कर हरी | . | १ |
| रामया व्येंकया आयावार | . | १ |
| व्येंकया वरदया आयावार | . | १ |
| जीवन बाबाजी | . | १ |
| वासुदेव जनारदन | . | १ |
| बी. नरसु | . | १ |
| रामचंद्र व्येंकटेश | . | १ |
| नागु शीवपा गोलेवार | . | १ |
| केशरीनाथ बाळकृष्ण | . | १ |
| विनायकराव वासुदेवजी | . | १ |
| गणपतराव बापूजी | . | १ |
| हरीचंद्र भास्करजी | . | १ |
| विष्णु राघोबा तोरणे | . | १ |

**येडीन्बर्ग.**

| | | |
|---|---|---|
| याकोब दानिएलजी तळकर | . | १ |

**ठाणें.**

| | | |
|---|---|---|
| विठोबा राघोजी गायकवाड कॉन्स्टेबल | . | १ |
| दादाजी उर्फ रेकबेन मुसाजी उमरडेकर | | १ |

**पुणें**

| | | |
|---|---|---|
| गंगाधर आनंत भट एम. ए. एल. सी. ई. | | १ |
| काशीनाथ मराठे बी. ए. | . | १ |
| काशिनाथ गोविंद नातू मास्तर | . | १ |
| मिस्तर. याकोब राहामीमजी तळकर फर्स्ट क्ला. हा. आ. स्टा. हा. | . | १ |
| मिस्तर समशेरसिंग. ने. मे. प्युपील | . | १ |

| | | |
|---|---|---|
| मिस्तर | रामजी गोपाळ स्टोर बॉय . | १ |
| ,, | सदाशिव लक्षुमण आ. व्हाक्सीनेटर | १ |
| ,, | रामजी सकपाल सेकंड क्ला. हाँ. आ. रोमन क्या. स्कूल . | १ |
| ,, | शिवाआपा नरसूअया आ. अयापाथिक्यारी सा. हाँ. . | १ |
| ,, | बाळू खंडू थर्ड. क्ला. हा. आ. सा. हाँ. | १ |
| ,, | दानिएल सॉलोमन ने. मी. प्युपील. | १ |
| ,, | शेक उसमान . | १ |
| ,, | बाळकृष्ण मोरोजी क्लार्क क. मी. आ. आँ. | १ |
| ,, | गणपतराव पांडूरंगजी ,, ,, | १ |
| ,, | विश्वनाथजी पांडुजी ,, ,, | १ |
| ,, | गोपिनाथ दामोदर ,, ,, | १ |
| ,, | माहादेव गोपाळ ,, ,, | १ |
| ,, | येशवंतराव नाना ,, ,, | १ |
| ,, | रामाया धरमाजी ,, ,, | १ |
| ,, | तुळाजी पुतळाजी ,, ,, | १ |
| ,, | गणपत सखाराम ,, ,, | १ |
| ,, | रामचंद्र ,, ,, | १ |
| ,, | नारायण स्वामी मुरलीयार ,, ,, | १ |
| ,, | रामचंद्र कृष्णाजी ,, ,, | १ |
| ,, | द्वारकानाथ विश्वनाथ, सेकंड ,, | १ |
| ,, | माधवराव गणोबा क्लार्क ,, ,, | १ |
| ,, | भास्कर भाईजी हेड क्लार्क क्लो. एक्सा. आँ. | १ |
| ,, | नारायण रावजी. क्लार्क ,, ,, | १ |
| ,, | योसेफ सालोमन झीराटकर ,, ,, | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मिस्तर | नारायण रघुनाथ सेकंड क्लार्क | | ,, | १ |
| ,, | मोशे हास्केल सानकर क्लार्क | ,, | ,, | १ |
| ,, | सदाशिव शामराव | ,, | ,, | १ |
| ,, | काशीनाथ केशवजी | ,, | ,, | १ |
| ,, | सी. जी. स्वान्सगर सेकंड क्ला. पे. एक्सा. ऑ. | | | १ |
| ,, | श्रीकृष्ण नारायण क्लार्क | ,, | ,, | १ |
| ,, | माधवराव रघुनाथ | ,, | ,, | १ |
| ,, | हास्केल शमुएल तळकर | ,, | ,, | १ |
| ,, | केशव वासुदेव नाईक | ,, | ,, | १ |
| ,, | आनंदराव साबाजी | ,, | ,, | १ |
| ,, | गोपीनाथ आत्माराम | ,, | ,, | १ |
| ,, | राघोबा यामाजी | ,, | ,, | १ |
| ,, | वासुदेव बापुजी नाईक क्ला. मे. एक्सा. ऑ. | | | १ |
| ,, | एन. बी. माते क्लार्क पे. पे. ऑ | | | १ |
| ,, | लक्षुमणराव क्लार्क पे. ऑ. पुना सरकल | | | १ |
| ,, | हानवतराव बापूजी क्ला. का. मा. ज. ऑ | | | १ |
| ,, | सीउ हुसेना | ,, | ,, | १ |
| ,, | विठ्ठल तुळसीराम | ,, | ,, | १ |
| ,, | बाळाजी खंडेराव | ,, | ,, | १ |
| ,, | चैतसिंग प्रा. | ,, | ,, | १ |
| ,, | मानाजी बिठोबा क्लार्क आ. ज. ऑ | | | १ |
| ,, | परशराम वासुदेवजी | ,, | ,, | १ |
| ,, | गणूजी जाणूजी | ,, | ,, | १ |
| ,, | दयाराम कलीयाणसिंग ट्रीचर कंपनी | | | १ |
| ,, | बंदुजी बापुजी भोनकर ड्रा. पेनशनर | | | १ |
| ,, | सालोमन एब्राहाम चरीकर | | | १ |

मिस्तर गणपतगीर रतनगीर . १
,, भवानीशंकर राघोनंद . १
,, येलीया शालोम . १
,, विष्णूदास परभुदास . १
,, सायमन डेवीड भोरपकर . १
,, धरमाजी भीकाजी; . १
,, जगन्नाथ रामचंद्र . १
,, दामोदर रामचंद्र . १
,, आचन्ना ईन्स्पेक्टर . १
,, येजीकीयल राहामीम . १
,, शेकहुशेन माहामद . १

**आहामदनर.**

,, आहारोन आब्राहाम क्यामीसारीएट ई. १

**बेळगांव.**

मि० आनंदराव भास्करजी हेड आकौन्टन्ट १
,, वाळकृष्ण विष्णु सब रेजीस्ट्रार . १
,, रंगास्वामी जेलर . १
,, आनंत पांडुरंग सिगन्लर . १
,, विठ्ठल सिंधे हा. आसीस्टन्ट . १
,, भवानी सिंग . १
,, दादा नाथाजी . १
,, लिंगो गंगाजी क्ला. पोस्ट. ऑ. . १
,, रामचंद्र नारायण डी. पोस्ट. मास्टर १
,, लक्षुमण बयाजी हॉं. आसीस्टन्ट . १
,, माधवराव वासुदेव तडकडकर . १
,, आपाजी लक्षुमण सराफ . १

मिस्तर भीकाजी आपाजी स. ओव्हरसीयर. प.व.डी. १
,, गोविंद कृष्णा क्लार्क. ई. ऑफीस . १

### भुसावळ.

जे. हाईम हेड गार्ड. जी. आय. पी. आर . १

### खंडवा.

ई. बेन्जामीन नेटीव डाक्तर . १

### नसीराबाद.

समाएल दानिएलजी बामनोळकर . १

### सिंध हाला.

दा. दानिएल सकोजी भोरपकर . १

### सिंध हैद्राबाद.

रेऊबेन येलीया दुदकर रैटर . १
शालोम मोशे सातामकर सब ओव्हरसीयर . १
योसेफ रेऊबेन दुदकर . १
समाएलजी ढोकरकर क्ला. म. हावलदार . १

### कराची.

योसेफ दाविदजी झेंडेकर दाक्तर . १
दाक्तर ई. मोझेस . १

### ३ री पलटण.

सुबेदार. मे. बहादुर शमुएल ईसाजी जावलीकर १
फ. क्ला. स्कुल. मा. हाईम शमुएलजी चरीकर १

### ४ थी रायफल.

सुबेदार मे. बहादुर. बाबाजी मोरजकर . १
फस्ट. क्ला. सुबेदार. दानिएल राहामीम तळकर. १
सुबेदार बलदेवसिंग . १
,, भाऊजी जादव . १

पे. आंडली. नाईक. भीकू गराटे . १
हवालदार. मेजर. गणपतराव . १
क्वा. मा. हावलदार. कृष्णाजी पाऊसकर . १
पे. हावलदार. नारोजी कदम . १
नाईक. मे. आडली. विठूजी बागवेम सुरेकर कील्लीदार १

६ वी पलटण.

ला. नाईक. क्वा. मा रैटर. . १
दानिएल शालोमजी कीलेकर . १

८ वी. पलटण.

सुबेदार मेजर. ईसाजी आहारोनजी . १
सुबेदार मेजर. रोबेनजी आष्टमकर . १
मिस्तर आब्राहामजी रोबेनजी आष्टमकर . १

१० वी पलटण.

डा. शमुएल दानिएलजी . १

१२ पलटण.

सुबेदार रोबेनजी ईस्राएल. . १
क्वा. मा. हवलदार बनेमजी सादीकजी . १
हवलदार गोविंद ल्हाडीक . १
" कमलनाक गोविंदनाक . १
नाईक. मास्टर राघोजी सेलार . १
" शमुएल इसाजी . १
प्युपील टीचर रत्नूजी राणे . १
शिपाई हरी जगताप . १
रीक्रुटबॉय हरी वानव्हेडकर . १
" रामा कदम . १
" सुब्रनाक हरनाक . १

३. क्लास. हाँ. आ. मोझेस येलाएजा . १
मेखाएल रेऊबेनजी भळेकर .. १

### १४ वी पलटण.

सुबेदार शालोम बांलाजी तळकर . १

### १९ वी पलटण.

सुबेदार शलोमो येलीया . १
" रामनाक लखनाक . १
जमादार शिमशोन दानिएल . १
प्रावेट जयराम भोपनकर . १
,, नारायणराव पवार . १
,, बाळाराम भोबीडकर . १
,, धरमा भांडवीलकर . १
,, पांडू जोशी वलवतकर . १
,, गोंडनाक वालनाक . १
री. वाँय गोविंद नरडेकर . १

### २६ वी पलटण.

हवालदार आ. क्लार्क रोबेनजी इस्त्राएल . १
ड्रील. हवालदार लक्षुमणसिंग . १
पे. दौलता गायकवाड . १
स्कु. मा. हा. गणू मटकर . १
मे. प्युपील. येहूदा रेउबेनजी . १
ना. क्वा. मा. रैटर भीमा माळी . १
सी. प्यु. टीचर. गणुजी कदम . १
सी. वींग. रैटर. रामनाक कुसनाक . १
सीपाई रामापा . १
,, समनाक पुसनाक . १

सिपाई नरसु कोळी . १

२८ वी पलटण.

सुबेदार राधाकिसन फर्स्ट क्लास. स्कु. मा. . १
" रामजी कदम . १
जमादार येलोजी आहारोनजी पेणकर . १
मी. राहामीम सीलेमान. आजीटन्ट क्लार्क . १
" रामप्रसाद बजार चौद्री . १
" रामदीन कुनबी ३ क्लास. हाँ. आसीस्टन्ट १
हावलदार रामा करीलकर आ. क्लार्क . १
क. हा. साबाजीराव हॉस्पीटल. आडली . १
हावलदार पुनाजी सुरवे पे. आडली . १
" धोंडसेट कोरगांवकर . १
" वीठू वराडकर . १
नाईक सकोजी झाडगुतकर देसाई . १
" शेक कादर . १
" सरावण जादव आ. स्कु. मास्टर . १
" गणू वांवकर का. मा. क्लार्क . १
सीपाई माधव गडरया आ. स्कु. मास्टर . १
" कृष्णा स्वामी आ. आजीटन्ट क्लार्क. १
" पांडू देवली . १
मीस्तर शेक महमद . १
" लीवी येलीया पेणकर . १